स्वादमय सेवेचा सकाळचा नाश्ता
मिसळपाव, पुरीभाजी, वडासांबर, इडलीसांबर, उडिदवडा सांबर, मसालाडोसा, उत्तपा
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड, अहमदनगर. फोन : २३४५४३०, २४१८३११, २३२७०६०




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३१-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहमदनगर, शुक्रवार दि. ०६.१२.२०२४ | अंक नं. २३३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



गोड गोड हुरडा
गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह
निसर्गाचा मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक मनोरंजनाची साधने व इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह साईबनमध्ये
हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध आजच संपर्क करा
साईबन
साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 226090

आपके शहर में पहली बार
भारतीय क्राफ्ट उत्सव
आज पासून भव्य शुभारंभ..!
खास आकर्षण
लखनवी चिकन सुट, सहारनपुर फर्नीचर, राजस्थानी बांगड्या, राजस्थानी पेंटिंग्स्, बनारसी साड्या, पश्चिम बंगाला साड्या, चंदेरी सिल्क साड्या, बेड कव्हर्स, दिवान सेट, केरळ ज्वेलरी, सतरंजी, मोजडी, फॅन्सी चप्पल, लेदर बॅग्स्, टॉप्स, टी-शर्ट्स, कारपेट, पंजाबी सुट, मंगलगिरी ड्रेस मटेरिअल्स, जयपुरी जूती, ब्लॉक प्रिंट, खुर्जा क्रॉकरी, टेराकोटा वगैरे
विविध प्रकारच्या हॅन्डीक्राफ्ट व हॅन्डलूम बनावटीच्या वस्तु सवलतीच्या दरात खरेदी करण्याची सुवर्ण संधी !
मोफत प्रवेश व पार्किंग
स्थळ - तांबटकर माळा ग्राउंड
पारिजात कॉर्नर चौक, गुलमोहर रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
वेळ : सकाळी 10.30 ते रात्री 10.00 पर्यंत

पाहिजेत
अकौंटंट / सेल्सगर्ल (महिला)
वेळ : स.१०.३० ते ८.००
समक्ष भेटावे
रॉयल रेक्झीन रामपूरवाला
पिरशाह खुंट, जुना कापड बाजार, अ.नगर
8308015252

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

राहण्याची सोय
मामाचा मळा
कृषी पर्यटन केंद्र
*पत्ता : नगर-सोलापूर रोड, रुईछत्तीसी, अ.नगर
Water Park
वॉटर पार्क
चुलीवरचे जेवण
मिकीमाऊस
बुल राईड
हॉर्स रायडींग
निसर्गरम्य
हुरडा पार्टी फक्त 300 रु/- मध्ये
रेन डान्स
जंपिंग टेबल
MO: 98 90 77 25 20 / 97 30 97 97 00
नगर-सोलापूर रोड, नगरपासून १५ मिनिट अंतरावर, रुईछत्तीसी





महाराष्ट्राचे लाडके माजी मुख्यमंत्री
मा. श्री. एकनाथजी शिंदे साहेब
यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन





* शुभेच्छुक *
मा.श्री. अनिल शिंदे
शिवसेना जिल्हाप्रमुख, मा.नगरसेवक
अहिल्यानगर नगर शहर शिवसेना | अहिल्यानगर जिल्हा दक्षिण शिवसेना | शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष | सर्व पदाधिकारी व शिवसैनिक

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## जॅक ऑफ ऑल... नव्हे अष्टपैलूत्त्व...

मा. राष्ट्रपती असतांना अब्दुल कलाम हे आयआयटीच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधत. एका विद्यार्थ्याने त्यांना विचारले, ''आपण शास्त्रज्ञ, राष्ट्रपती आहात. उत्तम लेखन, कविताही करता. या परस्परविरोधी गोष्टी एकाच माणसाला कशा काय साध्य होतात?''


डॉ. कलाम उत्तरले, ''यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. इंजिनिअरने कविता करू नये असे कुणी सांगितलंय. माझे इंजिनिअरींग मधले ज्ञान आणि माझी कविता ज्या ठिकाणी Intersect होतात तो नेहमीच माझ्यासाठी नव्या सर्जनाचा आरंभबिंदू Point of Creativity राहिलेला आहे.

जॅक ऑफ ऑल ॲण्ड मास्टर ऑफ नन असे गमतीने म्हटले जाते. पण अनेकविध विषयांत व क्षेत्रात प्रभुत्त्व गाजवणारी मंडळी पाहिली की जॅक ऑफ ऑल असणेही महत्त्वाचे वाटते. किंबहुना त्यातच व्यक्तिमत्त्वाचे अष्टपैलूत्त्व दिसते, वाढते.




बहुविध क्षेत्रात कार्यरत अष्टपैलूत्त्व सिद्ध करणाऱ्यांचा प्रवास सामान्याकडून असामान्याकडे झालेला असतो. म्हणूनच वाटते ठोकळेबाज मानसिकता बदलण्याची गरज आहे. चित्रपटातील हिरो अभ्यासात पुढे असतो, गाणे म्हणतो, गुंडांना लोळवतो अशी बहुगुणत्व असावे ना!

एक न धड भाराभार चिंध्या असं न समझता विविधात्मक गुण शोषणे हेच तर जीवन...



# नालेगाव चौकात आढळला अनोळखी तरुणाचा मृतदेह

नगर – शहरातील अमरधाम रोडवर नालेगाव चौकात एका अंदाजे ३५ वर्षीय अनोळखी तरुण बेशुद्धावस्थेत आढळून आला होता. त्यास परिसरातील नागरिकांनी रुग्णवाहिका बोलावून उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले आहे. बुधवारी (दि.४) सकाळी ११ च्या सुमारास ही घटना घडली.

नालेगाव चौकात एक तरुण बेशुद्धावस्थेत पडलेला असल्याची माहिती काही नागरिकांनी रुग्णवाहिका चालक अक्षय पाचारणे यास सांगितली. त्यांनी तात्काळ तेथे जावून सदर तरुणाला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात नेले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. विशाखा शिंदे यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तशी खबर कोतवाली पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी याबाबत आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम कोतवाली पोलिस करत आहेत.

# विमा प्रतिनिधींचा १७ डिसेंबर रोजी पुण्यातील आयुर्विमा महामंडळ कार्यालयासमोर सत्याग्रह

नगर – भारतीय आयुर्विमा महामंडळाने जुन्या सर्व योजना बंद केल्या असून मार्केटमध्ये विक्रीसाठी आणलेल्या नवीन योजनांमध्ये अनेक किचकट तरतुदी, काही संभाव्य तरतुदी, त्रुटींमुळे विमाप्रतिनिधींना अडचणीचे ठरत आहे. नवीन तरतुदींमुळे योजना ग्राहकांना फायदेशीर आहे ही चांगलीच गोष्ट आहे पण विमा प्रतिनिधींना मात्र त्या तरतुदी घातक आहेत याबाबत पुणे येथील भारतीय आयुर्विमा महामंडळाला देखील निवेदन देऊन घातक असलेल्या परिपत्रकाचा विरोध संपूर्ण देशभर विमा प्रतिनिधी करीत आहेत त्या अनुषंगाने १७ डिसेंबर रोजी पुणे येथे विभागीय कार्यालया समोर सत्याग्रह आंदोलन पुणे विभागातील विमा प्रतिनिधी करणार आहे, अशी माहिती ऑल इंडिया लाइफ इन्शुरन्स एजंटस् फेडरेशन ऑफ इंडिया पुणे विभागाचे विभागीय संघटक सचिव प्रमोदकुमार छाजेड यांनी दिली.





याबाबत श्री. छाजेड यांनी तसे निवेदन नुकतेच पुणे विभागीय कार्यालयाला दिले असून त्यामध्ये त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले की विमा प्रतिनिधी यांनी पॉलिसी विक्री केल्यानंतर जर ग्राहकाना काही अडचणीमुळे पुढील वर्षाचे हप्ते न भरल्यास व पॉलिसी सरेंडर केल्यास विमा प्रतिनिधीला दिलेले कमिशन पुन्हा वसुल करण्याची घातक तरतूद करण्याचा छुपा अजेंडा घेवून आयुर्विमा महामंडळ काम करत आहे, अशी आमची भावना झाली असून तसा स्पष्ट उल्लेख या परिपत्रकात जरी नसला तरी पडद्यामागून या हालचाली चालू असल्याच्या दिसून येत आहेत.

आयुर्विमा महामंडळाच्या आजपर्यंत झालेल्या लौकिकामध्ये सर्वात मोठे योगदान माझ्या सारख्या असंख्य विमाप्रतिनिधी बंधु भगिनींनी दिलेले आहे. याचा मला सार्थ अभिमान असून नव्याने चालु असलेल्या हालचाली पाहता आपल्या योजना ग्राहकांसाठी आकर्षक अशा चांगला बोनस देणाऱ्या आयुर्विमा महामंडळाने विक्री साठी काढाव्यात व विमा प्रतिनिधींना एक आर्थिक स्थैर्य पुर्वीप्रमाणे प्राप्त होण्यासाठी कमिशन दरामध्ये बदल न करता, तसेच दिलेले कमिशन वसुलीबाबत असे कुठलेही विमा प्रतिनिधीसाठी घातक असलेले निर्णय घेण्यात येवू नये तसे स्पष्टपणे लेखी पत्रासह आश्वासन मिळावे. ही मागणी मी विमा प्रतिनिधींच्या वतीने आपणाकडे करत आहे, असे निवेदनात नमूद करुन पुणे विभाग १, नगर, सोलापुरमधील विमा प्रतिनिधी काही प्रातिनिधीक स्वरुपात आपल्या कार्यालयसमोर १७ डिसेंबर रोजी उपस्थित राहून सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत सविनय सत्याग्रह आंदोलन करणार आहेत. असा इशारा दिला.

विमा प्रतिनिधींच्या भावना चेअरमन वरिष्ठांना आपल्या मार्फत कळविण्यात याव्यात की जेणेकरुन सत्याग्रह करण्याची वेळ येणार नाही. आम्हाला न्याय मिळेल, अशी अपेक्षा प्रमोदकुमार छाजेड यांनी व्यक्त केली आहे.

## अमृतलाल भंडारी यांचे संथाराव्रतात निधन



नगर – कडा (ता. आष्टी) येथील रहिवाशी व कापड व्यावसायिक अमृतलाल कोंडीराम भंडारी (वय ८५) यांचे ५ डिसेंबर रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्यावर कडा येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. किशोर भंडारी यांचे ते वडिल तर गौतम, सार्थक यांचे आजोबा होत.

## भानुदास कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील रहिवासी भानुदास गुरुनाथ कुलकर्णी (वय, ८३, रा.अष्टविनायक कॉलनी, पाईपलाईन रोड) यांचे ५ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजेश, अजय व सचिन कुलकर्णी यांचे ते वडील होत.

# नगरच्या बसस्थानकात महिलेच्या दागिन्यांची चोरी

### वारंवार चोऱ्या करत चोरट्यांचे पोलिसांना आव्हान, तपास काही लागेना

नगर – नगर शहरातील तारकपूर, जुन्या बसस्थानकासह स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात गेल्या काही दिवसांमध्ये महिलांचे दागिने, पर्स, चोरीच्या घटना वाढल्या आहेत. वारंवार होणाऱ्या या चोऱ्यांमुळे चोरट्यांनी पोलिसांना एकप्रकारे आव्हानच दिले असल्याचे दिसून येत आहे. अशाच प्रकारची आणखी एक घटना गुरुवारी (दि.५) सायंकाळी ७ च्या सुमारास स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात घडली आहे.

बसमध्ये चढत असताना तेथे झालेल्या गर्दीचा फायदा घेऊन महिलेच्या गळ्यातील दीड तोळा वजनाचे सोन्याचे मिनीगंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेला. कल्पना नितीन पारख (वय ५४, रा. मार्केट यार्ड जवळ, नगर बीड रोड, जामखेड) असे दागिने चोरीला गेलेल्या महिलेचे नाव आहे. त्या नगरहून जामखेडला जाण्यासाठी गुरुवारी (दि.५) सायंकाळी ७ च्या सुमारास स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात गेल्या होत्या.

तेथे जामखेडला जाणारी बस आल्यावर अनेक प्रवाशी बसमध्ये चढण्यासाठी धावले. कल्पना पारखही या गर्दीत बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दीड तोळा वजनाचे सोन्याचे मिनीगंठण कशाने तरी तोडून चोरुन नेले. बसमध्ये बसल्यावर चोरीची घटना त्यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर रात्री त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून याबाबत फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### बसस्थानके बनलेत चोरट्यांचे अड्डे

नगर शहर हे उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट आणि विदर्भ मराठवाड्याला जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असल्याने शहरातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रवाशांची जुन्या बसस्थानकात तर परजिल्ह्यात जाणाऱ्या प्रवाशांची तारकपूर व पुणे बसस्थानकात दररोज मोठी गर्दी होत असते. यात विशेषतः महिलांना एस.टी. बस प्रवाशी भाड्यात राज्य सरकारने सवलत जाहीर केलेली असल्याने एस टी बस प्रवासासाठी महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणावर आहे.

महिलांची गर्दी वाढण्याबरोबरच या गर्दीत बसमध्ये चढताना, उतरताना महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्समधील दागिने, पैसे चोरी जाण्याचे प्रमाणही वाढले आहे. चोरटे गर्दीत मिसळून हातसफाई करत आहेत. गेल्या काही दिवसांत या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने नगरमधील बसस्थानके चोरट्यांचे अड्डे बनले असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

## लक्ष्मणराव कावरे यांचे निधन



नगर – येथील फोटोग्राफर लक्ष्मण सिताराम कावरे (वय ८४, रा.चितळे रोड, हल्ली रा.पाईपलाईन रोड, अ.नगर) यांचे नुकतेच निधन झाले. २ डिसेंबर रोजी त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. संदीप भोगाडे यांचे ते सासरे होत.



**महापालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना प्रभारी आयुक्त प्रशांत खांडके, कर प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, हरियालीचे सुरेश खामकर, प्रशांत रामदिन, प्रशांत चांदणे आदी. (छाया – लहू दळवी)

## आगरकर मळा येथून २५ वर्षीय तरुण बेपत्ता

नगर – कामाला जातो असे सांगून मोटार सायकल घेऊन गेलेला २५ वर्षीय तरुण कोठेतरी निघून गेला. तो अद्याप घरी परतला नाही. अजय गोरख बनकर (वय २५, विशाल कॉलनी आगरकर मळा, अ.नगर) असे या तरुणाचे नाव आहे.


अजय बनकर

हा तरुण होडा शाईन कंपनीची मोटार सायकल (क्रमांक एम एच २०, सी एक्स ४४६४ ) ही घेऊन कामाला जातो असे सांगून राहते घरातुन दि.२३ नोव्हेंबर रोजी निघुन गेला.तो अद्याप घरी परतला नाही. त्याच्या घरच्यांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला असता तो मिळून आला नाही.

या प्रकरणी सुनिता गोरख बनकर (वय ४०, रा. विशाल कॉलनी, आगरकर मळा, अ.नगर) यांनी दिलेल्या माहितीनुसार कोतवाली पोलिसांनी हरवल्याची नोंद केली. अधिक तपास पोलिस नाईक एस एन साठे करीत आहे.

बेपत्ता मुलाचे नाव व पत्ता अजय गोरख बनकर, रा . विशाल कॉलनी आगरकर मळा अ.नगर, उंची ५ फुट १० इंच रंग सावळा शरीरयष्टी सडपातळ चेहरा गोल डोळे काळे केस काळे, अंगात पांढरा टी शर्ट व काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट उजव्या हाताचे दंडावर बजरंग बलीचा फोटो गोंदलेला असून, याबाबत काही माहिती मिळाल्यास नागरिकांनी कोतवाली पोलिसांशी संपर्क साधावा.

## राजेंद्र बोंदर्डे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भिंगार शहरातील सरपण गल्ली येथील रहिवासी राजेंद्र चंद्रकांत राजेंद्र बोंदर्डे (वय ६०) यांचे ५ डिसेंबर रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ६ डिसेंबर रोजी सकाळी भिंगार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

राजेंद्र बोंदर्डे यांना गुरुवारी सायंकाळी अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांचे नातेवाईक संजीव बोंदर्डे यांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. बटुळे यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तशी खबर त्यांनी भिंगार कम्प पोलिसांना दिली असून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. राजेंद्र बोंदर्डे यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, १ मुलगा, असा परिवार आहे. मयंक बोंदर्डे यांचे ते वडील होत.

## अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू नागरिकांना ओळख पटवण्याचे आवाहन

नगर – केडगाव येथील सोनेवाडी फाट्याजवळ बेशुद्ध अवस्थेत आढळून आलेल्या अंदाजे ३९ वर्षीय अनोळखी इसमास उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

याबाबतची माहिती जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ विशाखा शिंदे यांनी पोलिसांना दिली असून कोतवाली पोलिसांनी याबाबत अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. सदर अनोळखी मयत व्यक्तीचे वय अंदाजे ३९ वर्षे, उंची १७० सेमी, अंगात पांढरा, निळा रंगाचा टि शर्ट असे आहे. या अनोळखी मृत व्यक्तीचे नाव व गाव तसेच नातेवाईकांबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी कोतवाली पोलिस ठाणे फोन नंबर ०२४१– २४१६११७ यावर संपर्क साधून माहिती देण्याचे आवाहन कोतवाली पोलिसांनी केले आहे.

# पोलिस ठाण्यात आलेल्या नागरिक व तक्रारदारांशी सौजन्याने वागावे

### पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांची सूचना; कोतवालीतील गुन्हेशोध पथकाची फेररचना

नगर – पोलिसांनी पोलीस ठाणे हद्दीत घडणारे मालमत्तेविषयी गुन्ह्याची माहिती घेऊन तपास अधिकारी यांच्या मदतीने उघडकीस आणावे. घडलेल्या गुन्ह्यात आरोपींना तात्काळ ताब्यात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करावी. तसेच पोलिस ठाण्यात आलेल्या फिर्यादी व तक्रारदार यांच्याशी सौजन्याने वागावे असे आदेश कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सर्व पोलिस अंमलदारांना दिले आहेत.

कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडणाऱ्या गुन्ह्यांची तातडीने उकल व्हावी यासाठी पो. नि. दराडे यांनी गुन्हे शोध पथकाची (डी.बी.) फेररचना केली आहे. या संदर्भात पोलिस अंमलदारांना कामकाजाबाबत त्यांनी विविध सूचना दिल्या आहेत. अवैध धंद्याची माहिती घेऊन छापे टाकून अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करावे. पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवसा व रात्री नियमित पेट्रोलिंग करावी. पेट्रोलिंग साठी रवाना होताना व पेट्रोलिंग झाल्यानंतर पेट्रोलिंग दरम्यान काय कारवाई केली याबाबत सविस्तर स्टेशन डायरीला नोंद घ्यावी. यासह पोलीस ठाणे हददीतील क्रियाशिल आरोपी तसेच माहितगार आरोपीची माहिती अदयावत ठेवून त्यांना पेट्रोलिंग दरम्यान चेक करुन त्यांचे हालचालीवर लक्ष ठेवून गंभीर गुन्हा घडणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपींवर प्रभावी प्रतिबंधक कारवाई करावी. अवैध शस्त्र बाळगणारे, वापर करणारे, यांचा शोध घेऊन त्यांचेवर प्रभावी कारवाई करावी. जामिनपात्र व अजामिनपात्र वारंन्ट तसेच महत्वाचे समंन्सची बजावणी बाबत स्वतंत्र पथक आठवडयातुन दोन–तिन वेळा तयार करुन त्यांचे करवी बजावणी करावी. अशा अनेक सूचना दिल्या.तसेच पोलिसानी कामकाज करीत असतांना नागरीकांशी सौजन्याने वागावे तसेच त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारे लाचची मागणी करु नये अशा सक्त सूचना पो.नि. दराडे यांनी दिल्या आहेत.

नव्याने फेररचना केलेल्या गुन्हे शोध पथकात पोलिस हवालदार योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, संदिप पितळे, सलिम शेख, महिला पोलिस नाईक संगिता बडे,पोलिस कॉन्स्टेबल अभय कदम, पोलिस कॉन्स्टेबल अमोल गाडे, सुरज कदम, पोलिस कॉन्स्टेबल अतुल काजळे, पोलिस कॉन्स्टेबल दिपक रोहकले, तान्हाजी पवार, सचिन लोळगे,सतिष शिंदे, सत्यजित शिंदे, सुजय हिवाळे या पोलीस अंमलदारांचा समावेश आहे.

## बाळासाहेब उर्फ जयसिंग चोभे यांचे निधन



नगर – नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद येथील बाळासाहेब उर्फ जयसिंग दिनकर चोभे (वय ५४) यांचे २ डिसेंबर रोजी सायंकाळी दुःखद निधन झाले. त्यांच्या पाठीमागे पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. सोमवारी रात्री उशिरा राहत्या घराजवळ अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. एसआरएस साऊंड सिस्टीमचे मालक महादेव चोभे यांचे ते वडील होत.


# विजेच्या टॉवरवरून उडी मारून तरुणाची आत्महत्या

नगर – पाथर्डी तालुक्यातील लोहसर–धारवाडी या परिसरात बुधवारी (दि.४) रात्री साडेनऊ वाजेदरम्यान सुमारे शंभर फुट उंचीच्या विजेच्या टॉवरवरून एका तरुणाने उडी मारून आत्महत्या केली. गोरख तुकाराम घुले (वय ३२, रा. बाळेवाडी, ता.नगर) असे त्याचे नाव असून, त्याच्या आत्महत्येमागील कारण समजू शकले नाही.

मयत गोरख घुले हा लोहसर (ता. पाथर्डी) येथे सासरवाडीला गेले होता. त्याने बुधवारी (दि.४) रात्री साडेनऊ च्या सुमारास पाथर्डी तालुक्यातील वैजूबाभळगाव–पवळवाडी लोहसर–धारवाडी–मिरी या परिसरातून नव्याने कुकाण्याकडे जाणाऱ्या १३२ केव्हीची नवीन टॉवर लाईन टाकण्यात आली त्या सुमारे १०० फुट उंचीच्या विजेच्या टॉवरवर चढून खाली उडी मारली. काही वेळाने ही बाब निदर्शनास आल्यावर नातेवाईकांनी त्यास बेशुद्धावस्थेत उपचारासाठी पाथर्डी येथील उप जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी त्याला गुरुवारी (दि.५) पहाटे १.४० च्या सुमारास मयत घोषित केले.

पाथर्डी पोलीस ठाण्याचे सहाय्यक उपनिरीक्षक विलास जाधव, हेड कॉन्स्टेबल संभाजी कुसळकर, कॉन्स्टेबल भगवान टकले यांनी तात्काळ घटनास्थळी जावून पंचनामा केला. या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत गोरख घुले याच्या पश्चात आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, २ भाऊ असा परिवार आहे.

## अजित शेळके यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – शहरातील सरस्वती कॉलनी, वॉर्ड नं.७ येथील रहिवासी, सिव्हिल इंजिनिअर अजित मधुकर शेळके (वय ६३) यांचे पुणे येथे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ – बहिण, दोन मुले, सुन, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. अभिजीत (विकी) व अभिषेक (रवी) शेळके यांचे वडील, अनिल शेळके यांचे थोरले बंधू, खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सेवानिवृत्त शिक्षिका साधना अजित शेळके यांचे पती होत.

# 'सातबारा'वर नोंद घेण्यासाठी मागितली १० हजारांची लाच

### तलाठ्यावर गुन्हा दाखल, नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

नगर – सातबारा उताऱ्यावर खरेदीची नोंद लावण्यासाठी हळगाव (ता. जामखेड) येथील तत्कालीन तलाठ्याने दहा हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० मे रोजी ही मागणी करण्यात आली होती. आता सहा महिन्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तलाठी मुजीब अब्दुलरब शेख (वय ५१, तत्कालीन नेमणूक सजा हाळगाव, ता. जामखेड, सध्या नेमणूक तलाठी सजा सावरगावतळ, ता. संगमनेर, रा. नवीपेठ, कर्जत) असे आरोपीचे नाव आहे. तक्रारदार तरुणीच्या वडिलांनी हाळगाव येथील गट नंबर १५५ मधील १ हेक्टर १० आर व गट नंबर १५४ मधील २ हेक्टर ३० आर क्षेत्र खरेदी केले होते. या खरेदी खताची नोंद सातबारा उताऱ्यावर लावण्याच्या मोबदल्यात तलाठी शेख याने १० हजार रुपये लाच मागितल्याची तक्रार ३० मे रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल झाली.

त्यानुसार त्याच दिवशी लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. यात तलाठी शेख याने खरेदी खताची नोंद उताऱ्यावर लावण्याचा मोबदल्यात १० हजाराच्या लाचेची मागणी करून रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्यानुसार जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. संतोष शिंदे, पो.ना. चंद्रकांत काळे, पोलिस अंमलदार रवींद्र निमसे, बाबासाहेब कराड, चालक पो.हे.कॉ. हारून शेख यांच्या पथकाने ही कारवाई केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### शेवग्याच्या शेंगा खा पण...

शेवग्याच्या शेंगा (मोरिंगा) याला सुपरफूड म्हटले जाते, कारण त्यात अनेक पोषक घटक असतात. पण, शेवग्याच्या शेंगाचे अनेक फायदे असले तरी, काही परिस्थितींमध्ये त्याचा जास्त किंवा चुकीचा वापर केल्यानेही हानी होऊ शकते. पोटदुखी, पेटके आणि अपचन होऊ शकते. शेवग्याच्या शेंगांमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, जे जास्त प्रमाणात सेवन केल्यास अतिसार किंवा बद्धकोष्ठता होऊ शकते.

## पाककला

### रताळ्याची रबडी

**साहित्य :** २ मध्यम आकाराचे रताळे, अर्धा लिटर दूध, चार चमचे साखर, १/२ चमचा वेलची पूड, १ चमचा गुलाबजल, काजू, बदाम, एक चमचा तूप

**कृती :** सर्वात आधी रताळे स्वच्छ धुवून उकडून घ्यावे. आता ते छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये कापून घ्यावे. एका कढईमध्ये दूध घालून उकळून घ्यावे व दुधाला घट्टपणा येईपर्यंत उकळवून घ्यावे. दुधामध्ये उकडलेले रताळ्याचे तुकडे घालावे व आता शिजवून घ्यावे. यामध्ये साखर घालावी. त्यानंतर वेलची पूड घालावी तसेच गुलाबजल घालावे. हे मिश्रण चांगल्या प्रकारे मिक्स करावे. तसेच यामध्ये तुम्ही सुकामेवा सुद्धा घालू शकता.

## वास्तू

### इथे ठेवू नका तुळस

घराच्या दक्षिण दिशेला तुळशीचे रोप कधीही ठेवू नये, कारण ही दिशा पितरांची आणि यमराजाची मानली जाते. वास्तुशास्त्रानुसार तुळशीचे रोप ठेवण्याची उत्तम दिशा उत्तर-पूर्व आहे. त्याचप्रमाणे तुळशीचे रोप कधीही जमिनीत लावू नये ते नेहमीच कुंडीत किंवा वृंदावनातच लावावे.

## सल्ला

किचन मधील लाकडी सामान आणि लाकडाच्या वस्तू स्वच्छ ठेवण्यासाठी व्हिनेगर किंवा लिंबाच्या रसाचा वापर करावा.

## सौंदर्य

त्वचा जर कोरडी पडली असेल तर मधाचा वापर करुन त्वचा हायड्रेट ठेवू शकता. मधाने त्वचेवरील डागही कमी होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**शनिवार, दि. ७ डिसेंबर २०२४**

**चंपाषष्ठी, स्कंद षष्ठी, मार्तंड भैरवोत्थापन, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, धनिष्ठा १६।५१, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील. विनाकारण खर्च होईल.

**वृषभ :** आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न कराल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन :** मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क :** विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल.

**सिंह :** भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या :** खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होईल. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील. मातृचिंता सतावेल.

**तूळ :** आज नवीन कामे सुरू कराल. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत.

**वृश्चिक :** शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**धनु :** प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा-वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.

**मकर :** धन आणि किर्तीची हानी होईल. प्रतिस्पर्ध्यांपासून सावध राहा. आरोग्याची काळजी घ्याल.

**कुंभ :** आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे.

**मीन :** राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील. भागीदाराबरोबर सुद्धा मतभेद होऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


प्रियेसी : तु मला का समजून घेत नाहीस
प्रियकर : इथं मला माझी हॅण्डराईटींग समजत नाही तर तुला कसा काय समजून घेऊ?

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* भारतात लोटस् टेम्पल कोठे आहे? - दिल्ली
* मलेशियास कोणत्या वर्षी स्वातंत्र्य मिळाले? - ३१ ऑगस्ट १९५७
* श्रीलंकेतील सर्वात मोठे शहर कोणते? - कोलंबो
* माऊंट फूजीचे भौगोलिक स्थान कोठे आहे? - जपान

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६५ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) काळजीपूर्वक रक्षण; जतन ४) एक प्राणी; अजा; बकरी ६) पसरलेला सुगंध ८) धनुष्यबाण १०) वाईट; डावा ११) अतिशय प्रबळ इच्छा; एकसारखी बडबड १२) पाप; अधर्म १४) सवड; उसंत १५) बाजू; पंधरवडा १६) पायाने केलेला प्रहार १८) दणकट; बलशाली २१) एक गुजराती नृत्यप्रकार २२) फळातील रसाळ भाग; मगज

**उभे शब्द :-** १) अपत्य; मूल; संतान २) बिल्ला ३) मऊपणा; मृदुता; मवाळकी ४) मुख्य रस्त्याला लागून असलेली छोटी गल्ली ५) अस्थिर; दोलायमान ७) अरण्य; जंगल; रान ९) रुपे; चांदी; सिल्व्हर १०) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार ११) आवरण; साल; कवच १२) पाठोपाठ जाणे १३) चहा पिण्याचे एक भांडे; बशीचा जोडीदार १७) स्तर; पापुद्रा १८) दस्ता; कुटण्याचे साधन १९) गुंग; रत; रममाण; लीन २०) भय; भीती

**शब्दगंध क्र. ७०६४ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११६६ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** बोलण्याची शैली गोड असल्यास प्रतिसादही गोड लाभतो.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### जगामध्ये 'इंटरनेट'चा विस्तार कसा झाला?

१९८६ साली २३०८, १९९० साली ३१३००० आणि २०15 साली सुमारे ३.२ अब्ज लोक. ४० वर्षांत इंटरनेटच्या वापरात झालेली वाढ चक्रावून टाकणारी आहे. शाळेत 'इंटरनेटची तोंडओळख' असा तास अनेकांना आठवत असेल. लँडलाईन फोनवरून मिळणारं डायल-अप कनेक्शन, मग ते सुरू असताना फोन एंगेज्ड असणं, इंटरनेट एक्सप्लोररचं होमपेज उघडण्याची वाट पाहत बसणं आणि आता क्षणार्धात अख्खी फाईल डाऊनलोड करून देईल असं 5G नेटवर्क असा इंटरनेटचा सुपरसॉनिक प्रवास आहे.

सोशल मीडिया असो, बँकेचे व्यवहार असोत किंवा प्रवास, सिनेमाची तिकीटं, अगदी सलूनमधली अपॉइंटमेंट का असेना. सगळ्या गोष्टी घरबसल्या इंटरनेटवरून करता येतात. मोबाईल फोन्सवर इंटरनेट आल्यामुळे ते कानाकोपऱ्यात पोचलं. स्मार्टफोन आल्यापासून इंटरनेट नसलेला फोन वापरणारी माणसं विरळाच. या सगळ्या यंत्रांनी, वस्तूंनी आपल्या आयुष्यात असं अढळ स्थान निर्माण केलं आहे की, त्या नसत्या तर आपलं काय झालं असतं, याची कल्पनाच केलेली बरी.

आणखी काय संशोधनं होतील आणि या वस्तू कशा बदलतील हे येणारा काळच सांगेल. विज्ञानाची कास धरताना आपल्या प्रगतीमुळे निसर्गाचा ऱ्हास होणार नाही इतकीच खबरदारी आपण घेत राहावी हे महत्त्वाचं.

## तेनालीराम आणि महान पंडीत

एकदा एक पंडित फिरत फिरत विजयनगरला आले. ते राजा कृष्णदेवराय जवळ गेले आणि त्यांनी दावा केला की, त्यांच्या एवढा ज्ञानी या जगात कोणीही नाही. तसेच मी तो कोणत्याही विषयावरील वादविवादात राजाच्या सर्व मंत्र्यांचा पराभव करू शकतो असे आव्हान त्या पंडिताने राजाला दिले. तसेच राजाने आव्हान स्वीकारले आणि आपल्या मंत्र्यांना पंडितशी स्पर्धा करण्यास सांगितले. पण, पंडित हे प्रत्येक विषयाचे अभ्यासक असल्याने सर्व मंत्री त्यांच्या समोर हरले.

आता शेवटी तेनालीरामची पाळी आली. तेनालीने पंडितांना पुस्तकाच्या आकारात दुमडलेले कापड दाखवले आणि म्हणाले की, मी तुमच्याशी 'थिलकस्थ महिषा बंधनम' या महान पुस्तकातील एका विषयावर चर्चा करेन. तेव्हा पंडित विचारात पडले, कारण त्यांनी अशा कोणत्याही पुस्तकाचे नाव ऐकले नव्हते. आता पंडिताने राजाकडे एक रात्र मागितली.

पण, पुस्तकाविषयी कधीच काही ऐकले नसल्याने वादात हरेल अशी भीती पंडितांना वाटत होती. म्हणून त्याने आपले सर्व सामान बांधले आणि रात्री शांतपणे राज्यातून ते निघून गेले.

दुसऱ्या दिवशी रात्री पंडित राज्य सोडून गेल्याचे राजा आणि दरबारी यांनी ऐकले. तेनालीरामला पाहून महाराज प्रभावित झाले आणि म्हणाले की, मला ते पुस्तक वाचायचे आहे ज्याच्या धाकामुळे पंडित निघून गेले. तेव्हा तेनालीराम हसत म्हणाले की, अस कुठलंही पुस्तक नाही. मी फक्त शब्दांमध्ये लाकडाचा उपयोग केला होता. त्यात मेंढ्याचे शेण टाकले, त्याला दोरीने बांधून पुस्तकाचा आकार दिला आणि वर कापडाने झाकले आणि त्या कापडाच्या साहित्याचे नाव संस्कृतमध्ये आहे म्हणून पुस्तकाचे नाव ठेवले 'थिलकस्था महिषा बंधनम'. आता तेनालीरामच्या हुशारीने महाराज प्रभावित झाले आणि त्यांना बक्षीस दिले.

तात्पर्य : काही गोष्टींपुढे विद्वानही गोंधळून जातात. म्हणून स्वत:ला कधीच श्रेष्ठ समजू नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



### प्रस्तावना

इस सिलसिले में उन्होंने हिन्दुस्तान के कई शहरों का दौरा किया और लोगों तक सकारात्मक आध्यात्मिक का संदेश पहुँचाया। संत कृपालसिंह जी महाराज ने १९५१ ई. में गुड़मंडी, दिल्ली रेलवे स्टेशन से मिला हुआ 'सावन आश्रम' बनाया, जहाँ 'सत्संग' और 'नामदान' का सिलसिला बड़ी तेज़ी से फैलना शुरू हुआ। बहुत से सम्मेलन आयोजित हुए और अपने भाषणों के माध्यम से संतों और सूफ़ियों ने प्रेम और शांति का संदेश दिया। संत कृपालसिंह के वैराग्य और एकान्त प्रियता के कारण दर्शनसिंह जी रूहानी मिशन के कार्यों में तन-मन से लग गये।

अगस्त, १९७४ ई. में संत कृपालसिंह जी महाराज ने कहा था, दर्शन आध्यात्मिक मंडलों के हवाई सफर में मेरे साथ है। वह मेरी 'संगत' को वही प्यार देगा, जो उन्हें मुझसे मिलता है, और उसके बाद उन्होंने उन्हें उपदेश देने का अधिकार दे दिया, अर्थात सत्संग और नामदान की जिम्मेदारी दर्शनसिंह जी को सौंप दी।

२१ अगस्त, १९७४ ई. में संत कृपालसिंह जी महाराज के चोला छोड़ने पर उनके उत्तराधिकारी, संत दर्शनसिंह जी महाराज ने उनके आध्यात्मिक मिशन को और तेज़ी से आगे बढ़ाना शुरू किया। शीघ्र ही दुनिया के अधिकांश देशों में इस मिशन की शाखायें कायम हो गयीं। आज संत दर्शनसिंह जी महाराज की दया से लाखों लोग आध्यात्मिक लाभ उठा रहे हैं। देश-देश में उन्हें ऋषि और मुनि माना जाने लगा है। उनके मानने वालों के इस विशाल समूह में, विभिन्न धर्मों और राष्ट्रों से सम्बद्ध अलग-अलग भाषाओं को बोलने वाले लोग शामिल हैं, जो उन्हें आध्यात्मिक शक्ति वाला समझते हैं। उनकी चुनी हुई कृतियाँ अनुवादित होकर ५२ भाषाओं में प्रकाशित हो चुकी हैं। अपने आध्यात्मिक संदेश को पहुँचाने के लिए उन्होंने भारत के विभिन्न शहरों के अलावा विदेश का भी दौरा किया। उन्होंने चार बार विश्व भ्रमण किया, जिसका उद्देश्य था कि विश्व शांति स्थापित हो, सारे धर्मों के मानने वाले मिल-जुल कर रहें और इंसानी बिरादरी में एकता का वातावरण मज़बूत हो और लोग एक-दूसरे के दुःख-दर्द में शरीक हों। अपने विचारों को उन्होंने विभिन्न सम्मेलनों में कई बार रखा है। १९७८ ई. में उन्होंने दुनिया का पहला दौरा किया। इस दौरे में उनके पूर्वनिर्धारित कार्यक्रमों, भाषाओं के खाके और यादों की डायरी कहीं इधर-उधर हो गयी। उस समय संत दर्शनसिंह जी के सामने दो ही रास्ते रह गये थे- या तो सफर को टाल दें और घर लौट आयें या फिर अपने संत-सतगुरु की आध्यात्मिक कृपा और अपनी स्मरण शक्ति पर भरोसा करते हुए सफ़र जारी रखें। उन्होंने दौरा जारी रखा और वह सफल भी रहा। इस दौरे में वर्तमान युग के विद्वानों को उन्होंने अक्ल ही घुटन से निकाल कर प्रेम, जुनून तथा प्रभु प्रेम की खुली सड़क पर लाकर खड़ा कर दिया। उन्होंने अपने दौरे से नये क्षितिज, नयी दिशा और नई राह की निशानदेही की और हर मत-मतान्तर के मानने वालों को शांति और प्रेम का संदेश दिया। यही कारण है कि जब कि उन्होंने १९८३ ई. १९८६ और १९८८ ई. में दुनिया के दौरे शुरू किये, तो पश्चिम वालों के दिलों में पूर्व के सूफ़ियों संतों से नाता जोड़ने और उनकी शिक्षा के अध्ययन का नया उत्साह और शौक़ पैदा हुआ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

१००% परिणाम पाने के लिये १००% प्रयास करें। प्रयास यह है कि छिप कर पढे, छिप कर सेवा करें, छिप कर ही भगवान को याद करें। व्यर्थ की बातो और व्यर्थ के कार्यों में कि लोग क्या कहेंगे, इस में समय नष्ट न करें। जब आप आगे बढ़ जाएंगे तो कोई कुछ नहीं कहेगा। नहीं तो पल पल टोका टाकी होती रहेगी।

समय प्रबन्धन और मन

हमारा सब से ज्यादा समय मन बर्बाद करता है। मन सदा वहां रहता है जो हमें नहीं मिला। मन सदा कल में रहता है। मन सदा शिकायतों और उम्मीदों में रहता है। मन सदा अफसोस और पछतावो में रहता है। मन हिसाब किताब, लाभ हानि के साथ सांस लेता है। मन खुद भी भागता है और हमें भी भगाता है। मन निर्बल भी है बलवान भी है। मन आलसी भी है ऊर्जावान भी मन से ही हम राजा, मन से ही रंक बनते हैं। मन से ही श्रेष्ट, मन से ही नीच बनते हैं। हमें अपना समय बचाना है तो मन पर नियन्त्रण रखना होगा। मन में हम जो सोचते हैं, सोचते ही उसी व्यक्ति, उसी वस्तु, उसी घटना से जुड़ जाता है, उसी से बल लेने लगता है, जिस के बारे हम सोच रहे हैं। इसलिए मन पर नियन्त्रण के लिए सदैव अच्छी चीजो, अच्छी घटनाओ, अच्छे व्यक्तियों के बारे सोचते रहें, तब मन नियन्त्रण में आता है। मन से किसी न किसी की सेवा करते रहो, मानसिक तरंगे देते रहो, इस से मन नियन्त्रण में आ जाता है। दूसरी विधि है राजयोग की। जितना आप अपना मन भगवान शिव पर लगाए रखते हैं, उतना ही मन नियन्त्रण में रहता है।

मन सूक्ष्म शरीर का एक भाग है। मन स्वस्थ है तो शरीर स्वस्थ है । शरीर रोगी है तो समझो मन रोगी है। रोग शरीर में नहीं मन में होते हैं। मन और शरीर दोनो एक दूसरे को प्रभावित करते हैं। परंतु मन का शरीर पर ज्यादा असर होता है। मन से ज्यादा गतिमान इस दुनिया में कुछ भी नहीं है। मन में उठते नकारात्मक विचारों के कारण व्यक्ति कुछ करना नहीं चाहता या करने से पहले ही रुक जाता है। हम तो सफल हो ही नहीं सकते फिर मेहनत करने की क्या जरूरत है। यह सोच समझदार और बुद्धिवान व्यक्ति को भी कमजोर कर देती है। ऐसी सोच से व्यक्ति अपने को असहाय, मूर्ख व अस्वस्थ समझने लगता है। वह स्वंय को दूसरों की नजरो में कम साबित कर देता है। मन से हारते हैं तो निराशा आती है। निराशा आती है तो हम भय, बैचेनी, अशांति, भविष्य को अंधकारमय देखते हैं, विपत्ति को बढ़ा- चढ़ा कर देखते हैं। आप के मन में सकारात्मकता है, आशा है तो, आप जो चाहे बन सकते हैं। इस लिए मन में सदा सुन्दर ताने बाने बनाते रहा करो। जितना अधिक सकारात्मक विचार मन में रखेंगे उतने ही नकारात्मक विचार खत्म होते जाएंगे। लोगों की जो नकारात्मक टिप्पणियां आप को परेशान करती हैं वह समय बर्बाद करती हैं। ऐसी किसी भी बुरी टिपणी को याद मत करो। आप से जो गलतियां हैं उन्हें सोच सोच कर समय नष्ट न करें। जैसे ही कोई गलती आप से हो जाती है उस पर बैठ कर रोया मत करो तुरंत कोई न कोई बुक पढ़ो या भगवान को याद करो। अगर योग नहीं लग रहा है तो बाबा या ईष्ट का फोटो देख कर भगवान के गुण गाते रहो।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### सुयोग्य वाचनाचे महत्त्व

मुलांना घडविण्यात माता-पित्यांचा सहभाग फार महत्त्वाचा असतो. वाचनामुळे भावी माता सकारात्मक विचारसरणीत राहते. गर्भावस्थेत हार्मोनल बदल घडतात. स्त्रीच्या स्वभावात फार फरक पडतो. रडणे, चिडचिड करणे, भीती वाटणे, कामात लक्ष न लागणे हे बदल होतात. वाचनामुळे या सर्व तक्रारी दूर होऊन स्त्री त्या वाचनात मग्न होते. उदा. मृत्युंजय ही कादंबरी वाचत असताना स्त्री त्या काळातील, कर्णाचा, अर्जुनाचा विचार करायला लागते व त्यामुळे बाळांचे देखील मनन, चिंतन या गोष्टी वाढीला लागतात. प्रत्येक घरातील मूल हे शांत, सुसंस्कृत, वडीलधाऱ्यांचा आदर करणारे, समाजाची उन्नती करणारे होण्यासाठी योग्य वाचनाची गरज असते.

वाचताना घ्यावयाची काळजी :

वाचताना खुर्चीवर ताठ बसून वाचावे. त्याने मनाला निवांत वाटते. वाचताना जास्त वेळ खुर्चीत बसण्याची वेळ आली, तर पायाखाली उशी किंवा छोटा स्टूल घ्यावा. खुर्चीवर बसल्यानंतर पाठीमागे कमरेला आधार मिळण्यासाठी छोटीशी उशी घ्यावी. शक्यतो झोपून वाचू नये. बसून वाचण्यास फार कंटाळा आल्यास थोडा वेळ निवांत होण्यासाठी झोपून मनन, चिंतन करावे व बाळाशी त्या विषयावर संवाद साधावा.

**वाचनासाठी उपयुक्त पुस्तके व ग्रंथ :**

१) प्रकाश वाटा : डॉ. प्रकाश आमटे २) गिताई : विनोबा भावे की प्रज्वलित मने : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम की राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील - सुनिता विल्यम्स यांच्यावरील पुस्तके वाचावीत. ५) मृत्यूंजय - कर्णाचे आयुष्य समजण्यासाठी मृत्युंजय कादंबरी वाचावी

तरी संकल्पना, संस्कार वेध, ॐकार द्वंदकला, वेदान्ती सूक्ते - ॲड. शंकर निकम - बालकांना गर्भावस्थतेच श्लोकांचे व भारतीय वेद शास्त्राचे खरेखुरे ज्ञान होण्यासाठी.

भगवदगीता, दासबोध, ज्ञानेश्वरी, स्वामी विवेकानंदांवरील पुस्तके, आजच्या युगातील अण्णा हजारे यांची चरित्रे वाचावीत. तसेच 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे पंडित नेहरुंचे पुस्तक, म. गांधी यांचे चरित्र, शिवाजी महाराजांची कादंबरी अशा युगपुरुषांवरील पुस्तकांचे वाचन करावे. वाचनानंतर मनन व चिंतन जरुरीचे असते.

रहस्यकथा, भयकथा, सूडकथा यांचे वाचन टाळावे. अशा वाचनाने गर्भावर विपरीत परिणाम होतो. सूडकथा व भयकथा यामुळे गर्भवतीच्या मनावर परिणाम होऊन स्त्री भयभीत होते व त्यामुळे गर्भपात होण्याची शक्यता वाढते. याउलट बाळाला आनंद देणारे, रामाच्या कथा, श्रीकृष्णाच्या कथा,

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जलयुक्त शिवारमुळे टंचाईग्रस्त नागलवाडी झाली पाण्याची वाडी



नगर – शेवगाव तालुक्यातील नागलवाडी गावाने जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे करून टंचाईच्या परिस्थितीवर मात केली आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविले गेल्याने रब्बी हंगामासाठी देखील पाणी उपलब्ध झाले आहे.

शेवगाव तालुक्यात डोंगर माथ्यावर नागलवाडी गाव वसलेले आहे. तालुक्यातील कोरडा भाग म्हणून या गावाची ओळख आहे. डोंगर उताराचा भाग असल्याने पावसाचे पाणी खालच्या बाजूस वाहून जाते, त्यामुळे गावाला डिसेंबर अखेरीस पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. अडीच हजार लोकसंख्येच्या या गावाने अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना राबविण्याचा निर्णय घेतला. ग्रामपंचायतीने शिवार फेरीच्या माध्यमातून योजनेअंतर्गत आराखडा निश्चित केला.

डोंगरावरून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी वन विभागाने ठिकठिकाणी माती नाला बांध आणि दगडी बांध घातले. एका ठिकाणी सिमेंट नाला बांध बांधण्यात आला. कृषी विभागामार्फत २ शेततळे, ११ माती नाला बांधातील गाळ काढणे आणि २ फळबागांची कामे घेण्यात आली. तर जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागामार्फत २ साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली. जिल्हा नियोजन समिती मार्फत वन विभागाने जलसंधारण विभागाच्या सहयोगाने प्रथमच गेटेड साठवण बंधारा बांधण्यात आला त्यासाठी जिल्हा नियोजन समितीने ४९ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे.

जलसंधारणाच्या कामांमुळे मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी अडविण्यात यश आले. ४० सघमी पाणीसाठा निर्माण झाला. पूर्वी जानेवारी महिन्यातच नाल्यातील पाणी आटत असे. यावर्षी डिसेंबर महिन्यातही बंधाऱ्यात पाणी आहे आणि गावातील विहिरी तसेच विंधन विहिरींनाही पाणी मुबलक प्रमाणात आहे.

गेल्या वर्षापर्यंत गावात केवळ खरीपाचे पीक घेतले जात होते. यावर्षी रब्बीत गहू आणि हरभराची पेरणीदेखील शेतकऱ्यांनी केली आहे. यावर्षी टँकरने पाणी आणण्याची गरज भासणार नाही अशी प्रतिक्रिया स्थानिक शेतकऱ्यांनी दिली. गावात पाणी आल्याने शेतकऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. जलसंधारणाची अशीच कामे घेवून यापुढे गाव पाणीदार करण्याचा निश्चयही ग्रामस्थांनी केला आहे.

टंचाईग्रस्त गाव ही ओळख पुसण्यासाठी जलयुक्त शिवार योजना उपयुक्त ठरली आहे. यापुढे देखील जलसंधारणाची अशीच कामे घेवून गाव खऱ्या अर्थाने जलसमृद्ध करण्याचा प्रयत्न आहे, असे सरपंच किरण जाधव यांनी म्हटले आहे.

डोंगर उताराचा भाग असल्याने गावातील पाणी खालच्या बाजूस वाहून जायचे. खरीपातही पाण्याची समस्या जाणवते. आता मात्र सिमेंट बंधाऱ्याद्वारे पाणी अडविले गेल्याने शेतात गहू आणि हरभरा लावले आहेत. गावातील विहिरींनाही चांगल्या प्रमाणात पाणी आहे, असे शेतकरी शिवाजीराव खेडकर यांनी म्हटले आहे.

# राज्यस्तरीय 'तायक्वांदो स्पर्धेत' 'कार्मेल कॉन्व्हेंट'च्या विद्यार्थांचे यश

## दोघींना सुवर्ण : राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



सुवर्ण पदक विजेत्या अनन्या रानसिंग व सलोनी प्रसाद, प्राचार्या सिस्टर लिटील रोझ समवेत क्रीडा शिक्षक सतीश गायकवाड.

नगर – पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलात झालेल्या शालेय राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत अहमदनगर येथील कार्मेल कॉन्व्हेंट शाळेच्या अनन्या रनसिंग व सलोनी प्रसाद या विद्यार्थीनी तायक्वांदो क्रीडा प्रकारात सहभागी झाल्या होत्या आणि या खेळाडूंनी विशेष प्रावीण्य मिळविले. या स्पर्धेत खेळाडूंनी दोन सुवर्णपदक मिळविल्याचे क्रीडा शिक्षक सतीश गायकवाड यांनी सांगितले. सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे, असे कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या प्राचार्या सिस्टर लिटील रोझ यांनी सांगितले. स्पर्धेत अनन्या रानसिंग व सलोनी प्रसाद यांनी सुवर्ण पदक मिळविले.

वाडिया पार्क येथे झालेल्या शालेय जिल्हा स्पर्धेत या सर्व खेळाडूंनी सुवर्णपदक जिंकत विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले होते. पुण्यात झालेल्या विभागीय स्पर्धेतही विविध वजनगटांतही या खेळाडूंनी सुवर्णपदक पटकाविले होते. यशस्वी खेळाडूंचे प्राचार्या सिस्टर लिटील रोझ यांनी विशेष कौतुक केले असून क्रीडा शिक्षक सतीश गायकवाड तसेच वृषाली पटेकर यांचे अभिनंदन केले.



मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा शपथविधी झाल्यावर लगेचच शहर भाजपाच्या वतीने अनामप्रेममध्ये पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. तसेच महिला पदाधिकाऱ्यांनी हातावर मेहंदीने 'देवा भाऊ' रेखाटून अनोखा पद्धतीने आनंद व्यक्त केला.

# 'देवा भाऊ'ची मेहंदी रेखाटून व अनामप्रेम संस्थेत पेढे वाटून साजरा केला शपथविधीचा आनंदोत्सव

नगर – राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा गुरुवारी सायंकाळी शपथविधी झाल्यावर लगेचच शहर भाजपाच्यावतीने पक्ष कार्यालयात जल्लोषात महायुतीचा शपथविधीचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी फटाक्यांची आतषबाजी करून अनामप्रेम संस्थेमधील विद्यार्थ्यांना पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. तसेच भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांनी हातावर मेहंदीने 'देवा भाऊ' रेखाटून अनोखा पद्धतीने आनंद व्यक्त केला. यावेळी एकच भाऊ देवा भाऊ..., एकच नाथ एकनाथ व एकच वादा अजितदादा अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

शहर भाजपचे बहुतांशी पदाधिकारी मुंबई येथे शपथविधी सोहळा प्रत्यक्ष पाहण्यासाठी गेले असल्याने मोजक्या पदाधिकाऱ्यांनी हा आनंदोत्सव उत्साहात साजरा केला. यावेळी सरचिटणीस प्रशांत मुथा व माजी नगरसेवक सुवेंद्र गांधी यांनी फटाक्यांची लड पेटवून आतषबाजी केली.

यावेळी श्वेता झोंड, नीता फाटक, सुरेखा जंगम, ज्योती दांडगे, रेणुका करंदीकर, गोपाल वर्मा, सुहास पाथरकर, राहुल जामगावकर, अभिजीत ढोणे, प्रशांत बोऱ्हाडे, धीरज पडोळे, दीपक दंडनाईक, पियुष तावरे, प्रा.सुनील पंडित, गणेश गवळी, गणेश कानगावकर, ज्ञानेश्वर धिरडे, दीपक उमाप, सुनील सकट, रोहित पठारे, अशोक भोसले, भानुदास बनकर, विक्रम शिंदे, सचिन पळशीकर, राजेंद्र फुलारे, भार्गव फुलारे आदी उपस्थित होते.

# खऱ्या लाभार्थींना राष्ट्रीय अन्न पुरवठा सुरक्षेचा लाभ मिळण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील

## सपना भोवते यांचे प्रतिपादन; रामवाडीत कचरा वेचकांच्या रेशन कार्डचे केवायसी अपडेटसाठी शिबीर




रामवाडीत कचरा वेचकांच्या रेशन कार्डचे केवायसी अपडेटसाठी शिबिर घेण्यात आले.

नगर – खऱ्या लाभार्थींना राष्ट्रीय अन्न पुरवठा सुरक्षेचा लाभ मिळण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. शेवटच्या घटकांपर्यंत पोहचण्यासाठी संघटना प्रशासनासाठी दुवा म्हणून काम करत आहे. या शिबिराच्या माध्यमातून गरजूं पर्यंत शासनाच्या योजना त्यांच्या दारापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, असे प्रतिपादन सपना भोवते यांनी केले.

शहरातील कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्यावतीने रामवाडी येथील कचरा वेचक कष्टकऱ्यांसाठी रेशन कार्डचे केवायसी अपडेट करण्याचे शिबिर राबविण्यात आले. तर प्रातिनिधिक स्वरुपात लाभार्थींना डिजीटल रेशन कार्डचे वितरण तहसीलदार तथा अन्न धान्य पुरवठा अधिकारी सपना भोवते यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरासाठी सहाय्यक महसुल अधिकारी (अव्वल कारकुन) व्ही.ए. बेल्हे, संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, कचरा वेचक सभासद लंकाबाई शिंदे, सिंधू साबळे, कालिंदा धाडगे, लंकाबाई शेलार, सुशिला दिवटे, अंजना शेलार, अनुसया सोनवणे आदींसह कचरा वेचक लाभार्थी उपस्थित होते.

विकास उडानशिवे म्हणाले की, केचर वेचकांना शासनाच्या राष्ट्रीय अन्न पुरवठा सुरक्षेचा लाभ मिळण्यासाठी केवायसी अपडेट करणे आवश्यक झाले आहे. मात्र यासाठी मोठा वेळ व हेलपाटे मारावे लागत असल्याने कष्टकरी या कामासाठी गेल्यास त्याचा रोजगार बुडतो. त्यामुळे त्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. अशा परिस्थितीमध्ये कचरा वेचकांना त्यांच्या वेळेत हे शिबिर राबवून केवायसी अपडेट करुन डिजीटल रेशनकार्ड मिळवून देण्याचे कार्य संघटनेच्या माध्यमातून सुरु आहे. असंघटित कामगारांच्या धर्तीवर कचरावेचकांना राष्ट्रीय अन्न पुरवठा सुरक्षा अधिनियम २०१३ अन्वये असंघटित कामगार असलेल्या कचरावेचकांना प्राधान्याने लाभ मिळण्यासाठी संघटना प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिराच्या माध्यमातून रेशन दुकानदार युवराज लांडगे, खताडे, बाळासाहेब दिघे यांनी कचरा वेचकांचे केवायसी अपडेट करुन दिले. यावेळी रामवाडी भागातील नागरिक व कचरा वेचक उपस्थित होते.





भिंगारमध्ये आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन करताना छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिग. रसेल डिसोझा. समवेत उपाध्यक्ष वसंत राठोड, संजय सपकाळ, विशाल बेलपवार, डॉ. धनंजय कर्डिले, डॉ. अभिजीत आल्हाट आदी. दुसऱ्या छायाचित्रात आरोग्य केंद्राविषयी माहिती देताना वैद्यकीय अधिकारी.

# मुख्यमंत्री आपला दवाखानाचा भिंगारमध्ये शपथविधी वेळी शुभारंभ

नगर – राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत अहमदनगर छावणी परिषद क्षेत्रात दोन शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर झाले असून भिंगार मधील जुनी सरदार वल्लभभाई पटेल शाळा (वाड्याची शाळा) येथे नव्याने तयार केलेल्या शहरी आरोग्यवर्धिनी केंद्राचे (UHWC) मुख्यमंत्री आपला दवाखाना उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार या महायुतीच्या शपथ ग्रहण प्रसंगी करण्यात आले अशी माहिती छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड यांनी दिली

५ डिसेंबर रोजी दुपारी ५ वाजता छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिग. रसेल डिसोझा यांच्या हस्ते मुख्यमंत्री आपला दवाखाना चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, उपाध्यक्ष वसंत राठोड, मॉर्निंग ग्रुपचे संजय सपकाळ, किशोर कटोरे, विशाल बेलपवार, डॉक्टर धनंजय कर्डिले, डॉक्टर अभिजीत आल्हाट, जेष्ठ नागरिक विठ्ठलराव लोखंडे, मिराबाई आल्हाट, आर एम ओ डॉ. गीतांजली पवार, अधीक्षक नेहा पारनाईक, राजेश काळे आदीं उपस्थित होते

या शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना मोफत उपचार मिळणार असून त्यांना राहत्या घरापासून जवळ आरोग्य सुविधा उपलब्ध झाली आहे.

# देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्यात नगरच्या अपुर्वा निषाद हिने गायले 'राम राम जय राजा राम' गीत



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्यात राम जय राजा राम हे गीत सादर करताना अपुर्वा निषाद.

नगर – अहिल्यानगर येथील पार्श्वगायिका अपुर्वा निषाद हिने मुंबईत आझाद मैदान येथे झालेल्या मुख्यमंत्री शपथविधी सोहळ्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले व अजय अतुल यांनी संगीतबद्ध केलेले राम राम जय राजा राम हे गीत शपथविधी सोहळ्यात सादर केले. व भक्तीमय वातावरणात सर्व मंत्रमुग्ध झाले.

हे गीत अमृता फडणवीस यांनी गायलेले आहे. ते गीत अमित शहा, राजनाथ सिंग, योगी या सर्वांच्या उपस्थितीत सादर होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाले. सर्व बातम्यांच्या चॅनलवर हे लाईव्ह सर्वांनी पाहिले.

अपुर्वा निषाद ही पार्श्वगायक पं. सुरेश वाडकर यांच्याकडे शास्त्रीय गायन, संगीतकार अशोक पत्की यांच्याकडे सुगम संगीत शिकली आहे.

# अफवांवर विश्वास ठेवू नये; आरोग्य विद्यापीठाचे आवाहन

नाशिक – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांबाबत मोठ्या प्रमाणात समाजात चूकीचे संदेश व अफवा पसरविण्यात येत आहेत. अश्या संदेशांची सत्यता पडताळण्यासाठी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द माहितीची विद्यार्थी व पालकांनी खात्री करुन घेणे गरजेचे आहे.

परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले की, परीक्षेबाबत विविध समाज माध्यामांद्वारे लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांबाबत अफवा व चूकीचे संदेश पसरविण्यात येत आहे. परिक्षार्थीनी कुठल्याही समाज माध्यमांवर प्रसारित होत असलेल्या संदेशांवर, अफवांवर विश्वास ठेवू नये. तणावमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे. अशाप्रकारे चूकीचे संदेश, अफवा पसरविणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

हिवाळी सत्र–२०२४ च्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा राज्यातील एकूण शंभरपेक्षाअधिक परीक्षा केंद्रावर घेण्यात येत आहे. विविध विद्याशाखांच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेकरीता सुमारे ३०, ९०२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी विद्यापीठाकडून काळजी घेण्यात येत आहे. तरी संलग्नित महाविद्यालय प्रमुख, विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी याबाबत सजग रहावे असे विद्यापीठाकडून आवाहन करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली प्लॉट मिळकत विद्यमान मालक **गोपीनाथ त्रिंबक म्हसे, रा. भवानीनगर, वाकोडी रस्ता, अहमदनगर** यांच्या मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक खोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत याची.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे केडगांव** येथील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ५०९/११+५०९/१२ हा संपूर्ण प्लॉट | १५ | २०५.३७ चौ.मी. |

**यासी चतु:सिमा-**
पुर्वेस – प्लॉट नं. १४, दक्षिणेस – प्लॉट नं.१६,
पश्चिमेस – ९ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस – ६ मीटर रुंदीचा रस्ता,
दि.०६/१२/२०२४
अहमदनगर.

**ॲड. मोहसीन आय. शेख** **ॲड. गुफरान एफ. मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं. ८०८७७४२४२८ / ९२०९५९७१५०



## जाहीर निविदाअंतर्गत खुली निविदा सूचना

ग्रामपंचायत दादेगाव.ता. शेवगाव जि. अहमदनगर यांचे कडून जिल्हा परिषद नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या मार्फत दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या निविदा मागवत आहे. (योजना – स्व. भा. अ व १५ वित्त आयोग)

| अ. नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा संचाची रक्कम | बयाना रक्कम | कामाची मुदत | अधिकृत ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे दादेगाव येथे सार्वजनिक सौचालाय बांधकाम करणे. | ३,००,०००/– | ५९० | १% | ६महिने | खुला |

(१)निविदा अटी व शर्ती इ.बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच दि. ०६/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दि. १३/१२/२०२४ सायं. १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दर टाकून सिलबंद लिफाफ्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सादर करता येतील. (२) निविदा संदर्भात सविस्तर माहिती अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. तसेच ब – १ निविदा संच फॉर्म ग्रा. पं. मध्ये विक्री साठी उपलब्ध आहे. (३) निविदा दि. १६/१२/२०२४ रोजी सकाळी १०:०० ग्रा.पं. दादेगाव येथे उघडण्यात येतील. (४) निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे. (५) निविदे सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडावे.

सही
ग्रा. पं. अधिकारी ग्रा.पं. दादेगाव
ता. शेवगाव जि. अहमदनगर,

सही
सरपंच ग्रा. पं. दादेगाव
ता. शेवगाव जि. अहमदनगर



## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर
## दरपत्रक सुचना क्र / यां / ०५ / सन २०२४–२५

दुरध्वनी क्रमांक ०२४२५–२२५३३५

कार्यकारी अभियंता, **सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर** हे यांत्रिकी शाखा – संगमनेर येथिल परिसरातील निरूपयोगी साहित्य लिलाव करणे कामाच्या सीलबंद दरपत्रके बाहय अभिकरण /स्क्रॅप विक्रेता यांचेकडून दिनांक ०६/१२/२०२४ पासुन ते दिनांक १६/ १२ / २०२४ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत दरपत्रके मागवीत आहे. कार्यकारी अभियंता, **सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर** यांच्या कार्यालयाकडे दिनांक १६/१२/२०२४ दुपारी १६.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत दरपत्रके सादर करावेत. दरपत्रके स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता **सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर** यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र. | **कामाचे नाव** - यांत्रिकी शाखा – संगमनेर येथिल परिसरातील निरूपयोगी साहित्य लिलाव करणे | | | |
|---|---|---|---|---|
| १. | साहित्य / उपकरणे विवरण | नग / संख्या | दर (जी एस टी वगळून) | अंदाजित रक्कम |
| सोबत – यादी | | | | |

सदर दरपत्रकाबाबतचा तपशील सोबत जोडण्यात येत आहे.

१. वरील कामाचा सिलिबंद दरपत्रके कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर यांच्या कार्यालयात दिनांक १६/१२/२०२४ रोजी दुपारी १४.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील आणि प्राप्त सिलिबंद दरपत्रके शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

टीप – १. सविस्तर दरपत्रक सूचना या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर पाहावयास मिळतील.
२. कोणतेही कारण न दर्शवता दरपत्रके नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्याने राखून ठेवलेला आहे

जा.क्र./दरपत्रके /यांत्रिकी / ११२९५ सन २०२४
यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर
प्रत– नोटीस बोर्ड.

**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
संगमनेर

यांत्रिकी शाखा – संगमनेर येथील परिसरातील निरूपयोगी साहित्य लिलाव करणे - **यादी**

| अ.क्र. | निरूपयोगी साहित्य | नग / संख्या | दर (जी एस टी वगळून) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ट्रक / टँकर टायर | २५ | | |
| २ | कार/जीप टायर | १६ | | |
| ३ | डिसमेंटल साहित्य | ५० | | |
| ४ | कर्मशाळा निरुपयोगी साहित्य – लोखंडी. | १००० किलो. | | |

**उप अभियंता**
सा. बां. (यां.) उप विभाग,
अहमदनगर

**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
संगमनेर

जिमाका / नगर / जाहि /१६६/ २०२४–२५





मार्केटयार्ड चौकात वंचित बहुजन आघाडी अहिल्यानगर दक्षिणच्या वतीने ईव्हिएम विरोधात जनआंदोलन स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. (छाया – उदय जोशी)

# ईव्हिएमच्या विरोधातील रोष स्वाक्षरी मोहिमेतून दिसून आला

## प्रत्येकाच्या सहीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

नगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मतदानाच्या माध्यमातून राजा बनविले आहे. ईव्हिएमच्या माध्यमातून घोळ घालून एकहाती सत्ता भाजपा सरकारने आणली आहे. ईव्हिएमच्या विरोधात सह्यांची मोहीम राबवत आहे, त्याला प्रतिसाद मिळत आहे. ईव्हिएमच्या विरोधात जो रोष आहे, तो दिसून आला आहे, असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी केले.

मार्केटयार्ड चौकात वंचित बहुजन आघाडी अहिल्यानगर दक्षिण व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने ईव्हिएम विरोधात जनआंदोलन स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जिल्हा संघटक सुधीर ठोंबरे, विजू भोसले नगर, शहराध्यक्ष हनीफ शेख, महासचिव अमर निरभवणे, जे.डी. शिरसाठ, मनोज कर्डिले, गणेश राऊत, रवींद्र शिरसाठ, अक्षय शिंदे, संजय डहाणे, बबलू भिंगारदिवे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष भगवान गायकवाड, महासचिव राजेंद्र साळवे, शहर अध्यक्ष राम गायकवाड, महिला अध्यक्ष सुनीता गायकवाड, उपाध्यक्ष अर्चना गायकवाड, सिंधुताई साळवे, बाळासाहेब बनकर, बाबासाहेब डोळस, रेखा बनकर, हर्षा पंचमुख, बापू शिंदे, माधवराव चाबुकस्वार, मेहेर भिंगारदिवे, अतुल आखाडे, सचिन साळवे, रवींद्र शिरसाठ, देवराम भिंगारदिवे, हिरामण भिंगारदिवे, अशोक भिंगारदिवे, चंद्रभान भिंगारदिवे, दादू शिरसाठ, दशरथ माळी, शाडू शिरसाठ, पप्पू भिंगारदिवे, रोहन भिंगारदिवे, आदीसह नागरिक उपस्थित होते. प्रथमत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाणदिनीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# राहाता मंडळ अधिकारी कार्यालय बनले राज्यातील पहिले क्यू-आर कोड वाचनालय

## मंडळ अधिकारी डॉ.मोहसिन शेख यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम




राहाता मंडळ अधिकारी कार्यालय बनले राज्यातील पहिले क्यू–आर कोड वाचनालय. समवेत मंडळ अधिकारी डॉ.मोहसिन शेख.

नगर – महाराष्ट्र शासन राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता –२०२३ प्रथम क्रमांक पुरस्कार प्राप्त राहाता शहराचे मंडळ अधिकारी डॉ.मोहसिन शेख यांनी मंडळ अधिकारी कार्यालय राहाता येथे क्यू आर कोड वाचनालय या संकल्पनेचा नाविन्यपूर्ण प्रयोग राबविला असून त्यामुळे राहाता मंडळ अधिकारी कार्यालय राज्यातील पहिले क्यू आर कोड वाचनालय निर्माण करणारे कार्यालय बनले आहे. क्यू आर कोड वाचनालयमध्ये वरिष्ठ महसूल उप जिल्हा अधिकारी डॉ.संजय कुंडेटकर, उप जिल्हाधिकारी बबन काकडे, उपजिल्हाधिकारी गणेश मिसाळ, तहसिलदार शशिकांत जाधव, मंडळ अधिकारी विनायक यादव व डॉ.मोहसिन शेख यांनी लिखाण व संकलित केलेल्या पुस्तकांचे आकर्षक मुखपृष्ठ तयार करणेत आले असून सदर मुखपृष्ठावर त्या पुस्तकाचे क्यू आर कोड दर्शविण्यात आले आहे. सदर क्यू आर कोड स्कॅन केल्यानंतर सदर पुस्तक सहज मोबाईलवर विनामूल्य उपलब्ध होणार आहे.

राहाता मंडळ अधिकारी कार्यालयाने राबविलेल्या क्यू आर कोड वाचनालय या संकल्पनेमुळे सर्व सामान्य नागरिक, शेतकरी व विधिज्ञ यांना फायदा होत असून या वाचनालय मध्ये वारस कायदे, फेरफार नोंदी, महसूल प्रश्नोत्तरे, तालुका स्तरीय समित्या, माहिती अधिकार कायदा, तलाठी मार्गदर्शिका, ऑनलाईन ७/१२ व महसूल संबंधी जवळपास १०१ लेख यांचा समावेश असणारे नाबाद १०१ अशा पुस्तकांचा समावेश आहे.यामुळे महसूल मधील कायद्यामधील किचकट बाबी सहज सोप्या भाषेत नागरिकांना त्यांचे मोबाईल द्वारे मिळणार आहेत. सदर पुस्तकांची प्रिंट काढून पुस्तके संग्रही ठेवता येणार आहेत.

महसूल संबंधी माहिती व कायद्याचे ज्ञान सर्व सामान्य नागरिकांना सहज एका क्लिक वर मिळावे म्हणून मंडळ अधिकारी कार्यालय येथे क्यू आर कोड वाचनालय ही संकल्पना राबविण्यात आली असून याचा सर्व सामान्य नागरिकांना नक्कीच फायदा होईल, असे मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांनी म्हटले आहे. विशेषतः जनसामान्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त आणि प्रशंसनीय उपक्रम असल्याचे डॉ. संजय कुंडेटकर उपजिल्हाधिकारी (से.नि) यांनी म्हटले आहे.

# शासकीय व निम शासकीय कार्यालयासह शाळांमध्ये राष्ट्रसंत श्री जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करावी



नगर – महाराष्ट्र शासनाने राष्ट्रसंत श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्याचे आदेश महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.ज.पु.ति.२२१८/प्र.क्र.१९५/२९ दि.२६/१२/२०१८ रोजी पारित केलेले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व सरकारी कार्यालय, पोस्ट ऑफिस, पोलीस स्टेशन, कलेक्टर कचेरी, तहसीलदार कचेरी, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पोस्ट ऑफिस, महानगरपालिका, शाळा, महाविद्यालय तसेच शासकीय, निमशासकीय कार्यालयात ८ डिसेंबर रोजी सरकारी कार्यालयांना सुट्टी आहे. राष्ट्रसंत श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करावी. जयंती साजरी करण्यासाठी कोणाला फोटो हवे असल्यास हरिभाऊ डोळसे, पत्ता–घर नंबर ५२३६, जुना बाजार, अहिल्यानगर. माहितीसाठी ९८२२२७१८०७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महासभेचे नाशिक विभागीय कार्याधक्ष हरिभाऊ डोळसे यांनी केले आहे.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भाजपच्यावतीने अभिवादन

भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर महानगरच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, चिटणीस शहर जिला गोपाल वर्मा, सुवेंद्र गांधी, कालींदी केसकर, सुरेखा जंगम, लीलाताई अग्रवाल, निता फाटक, ज्योती दांडगे, मीरा सरोदे, विजय गायकवाड़, विशाल खैरे, सुरेश लालबागे, सचिन पळशीकर, सुनिल सकट, राजेंद्र फुलारे, भारगव फुलारे, ज्ञानेश्वर धिरडे, सुनिल तावरे, प्रकाश जोशी, लक्ष्मीकांत तिवारी, सविता कोटा, राजेंद्र सातपुते, अनिल सबलोक, अनंत देसाई, भानुदास बनकर, गोकुल काळे, प्रीया जानवे, श्वेता पंधाडे, सारीका जंगम, दत्ता गाडलकर, चंद्रकांत पाटोळे, अनिल सबलोक, श्वेता झोंड, सविता कोटा आदी. (छाया – उदय जोशी)

# समाजाला दिशादर्शक असलेले बाबासाहेबांचे विचार म्हणजे क्रांतीची जननी

## एन. एम. पवळे यांचे प्रतिपादन; जिल्हा परिषदेत कास्ट्राईब महासंघाच्यावतीने बाबासाहेबांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



जिल्हा परिषदेत कास्ट्राईब महासंघाच्यावतीने बाबासाहेबांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

नगर – भारतीय लोकांना समता बंधुता मिळवून देणारी राज्यघटना लिहिण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. राज्यघटनेमुळे देशात समता, बंधुता नांदत आहे. बाबासाहेबांनी अन्याया विरोधात दिलेला लढा कायम स्फूर्ती देणारा आहे. त्यांचे विचार आजही समाजाला दिशादर्शक असून, हे विचार क्रांतीची जननी असल्याचे राज्याध्यक्ष एन.एम. पवळे यांनी सांगितले.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हा परिषदेत त्यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी राज्याध्यक्ष एन.एम. पवळे, जिल्हाध्यक्ष के.के. जाधव, राज्य उपाध्यक्ष वसंतराव थोरात, अतिरिक्त महासचिव सुहास धीवर, महिला जिल्हाध्यक्षा नंदाताई भिंगारदिवे, बाळासाहेब शिंदे, दादासाहेब शिंदे, सिकंदर वाकरे, निखिल पठारे, श्याम गोडळकर, श्याम थोरात, समीर वाघमारे, गडदे, विनायक गोंडाळ, सुधा जाधव, धरती गायकवाड, सोमनाथ शिंगाडे आदींसह कास्ट्राईबचे पदाधिकारी व कर्मचारी सदस्य उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष के. के. जाधव यांनी तत्कालीन व्यवस्थेविरोधात संघर्ष करून बाबासाहेबांनी दीन–दलितांचा उद्धार केला. शोषितांचा आवाज बुलंद करुन जातिव्यवस्थेने बरबटलेल्या काळोखात बाबासाहेबांनी समाजाला प्रकाशवाट दाखवली असल्याचे त्यांनी सांगितले.

# वाड्या वस्त्यांच्या रस्त्यांचा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत समावेश करावा

## खा. नीलेश लंके यांचे मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे मागणी



जोड नसलेल्या वस्त्यांच्या रस्त्यांचा सन २०२४–२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये समावेश करून त्यास मंजुरी देण्याची मागणी निवेदनाद्वारे मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे करताना खासदार नीलेश लंके.

नगर – नगर लोकसभा मतदारसंघातील जोड नसलेल्या वाड्या वस्त्यांच्या रस्त्यांचा सन २०२४– २५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये समावेश करून त्यास मंजुरी देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय ग्रामविकास आणि कृषि, शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या कडे केली आहे.

खा. नीलेश लंके यांनी गुरूवारी (दि.५) मंत्री चौहान यांनी भेट देऊन रस्त्यांच्या कामांसंदर्भात निवेदन सादर केले. या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर लोकसभा मतदारसंघात रस्त्यांच्या जाळयाचा प्रचंड अनुषेश आहे. अनेक गावे मुख्य रस्त्यांना जोडलेली नसल्याने स्थानिक नागरीकांना तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणी जाण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पावसाळयात नागरीकांना दैनंदिन जीवनामध्ये मोठा त्रास सहन करावा लागतो. दळणवळणात अडचणी येत असल्याने त्यांचे जनजीवन ठप्प होते.

ग्रामीण भागातील रस्त्यांच्या समस्यांबाबत दखल घेऊन ग्रामीण जनतेचे जीवन सुलभ व्हावे, दळणवळणाला गती मिळावी यासाठी सन २०२४–२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये निवेदनातील नमुद रस्त्यांचा समावेश करून त्यास मंजुरी देण्यात यावी व शहरे किंवा गावांशी जोडण्यासाठी या कामांना निधीची तरतुद करण्याची विनंती खा. लंके यांनी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे केली. मंत्री चौहान यांनी खासदार नीलेश लंके यांच्या निवेदनाची दखल घेऊन सन २०२४–२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत निवेदनातील नमुद रस्त्यांना मंजुरी देऊन निधीची तरतुद करण्याची ग्वाही दिली.

# देव देवतांच्या काळापासून योग साधनेला महत्त्व

## हभप राजाभाऊ कोठारी महाराज यांचे प्रतिपादन; प्रोफेसर चौकातील साधना कॉलनी येथे शिवतत्त्व योगपीठ केंद्राचे उद्‌घाटन




प्रोफेसर चौकातील साधना कॉलनी येथे शिवतत्त्व योगपीठ केंद्राचे उद्‌घाटन करताना हभप राजाभाऊ महाराज कोठारी.

नगर – आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मनुष्य आपल्या शरीराकडे दुर्लक्ष करीत आहे या धकाधकीच्या जीवनामध्ये योग साधनेला खूप महत्त्व असून देव देवतांच्या काळापासून योगासने सुरु असून मन, शरीर, निरोगी व सुदृढ राहण्यासाठी ध्यानधारणेला महत्त्व आहे तरी नागरिकांनी आपले जीवन आनंदीमय व निरोगी राहण्यासाठी दररोज व्यायाम व योगसाधना करावी शिव तत्व योग विद्यापीठाच्या माध्यमातून नगरकरांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होईल असे प्रतिपादन ह भ प राजाभाऊ महाराज कोठारी यांनी केले.

प्रोफेसर चौकातील साधना कॉलनी येथे शिवतत्त्व योगपीठ केंद्राचे उद्‌घाटन हभप राजाभाऊ महाराज कोठारी यांच्या हस्ते झाले. यावेळी संचालिका गायत्री लोंढे, माजी नगरसेविका संगीता खरमाळे, विशाल लोंढे, बाबासाहेब गिरवले, जस्मिन वधवा, आशिष चंगेडिया आदी उपस्थित होते.

गायत्री लोंढे म्हणाल्या की, शरीरातील प्रत्येक पेशीला बरे करण्याचे आणि वाढविण्याचे कार्य योगा करत असल्याने तुमचे शरीर आपोआप अधिक रोगप्रतिकारक बनते. त्यामुळे तुमची प्रतिकारशक्ती वाढते. नियमितपणे योगाभ्यास केल्याने तुम्हाला तुमच्या स्वतःच्या शरीराची जाणीव होण्यास मदत होईल. तुमचे संरेखन वाढविण्यासाठी तुम्ही सूक्ष्म हालचाली करण्यास सुरुवात कराल. योगाभ्यासाने रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. म्हातारपणातही तुम्ही तरुण राहू शकता, त्वचेवर चमक येते, शरीर निरोगी, निरोगी आणि मजबूत होते. एकीकडे योगासनांमुळे स्नायूंना बळ मिळते, त्यामुळे दुबळा माणूसही सशक्त होतो, तर दुसरीकडे नियमित योगासने केल्याने शरीरातील चरबीही कमी होते. योग कृष आणि स्थूल दोन्हीसाठी फायदेशीर आहे असे त्या म्हणाल्या



विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## ‘बी १२’ मिळवण्यासाठी...

व्हिटॅमिन बी १२ शरीरासाठी महत्त्वाचे असते. शाकाहारी लोकांमध्ये त्यांची कमतरता असते. व्हिटॅमिन बी १२ हे मांसाहारी पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात आढळते. परंतु काही ड्रायफ्रूटस्मध्येही याचे प्रमाण चांगले असते. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे शरीर कमकुवत होऊ शकते. व्हिटॅमिन बी १२ चे चांगले स्रोत कोणते ड्रायफ्रूट आहेत ते जाणून घ्या.

**मनुका :** मनुके हे व्हिटॅमिन बी १२ चे चांगले स्रोत आहेत. रात्री मनुका भिजवून सकाळी त्या खाल्ल्यामुळे त्याचा चांगला फायदा होतो. मनुका इतर ड्रायफ्रूटच्या तुलनेत स्वस्तसुद्धा असतात. मनुका खाल्ल्यामुळे हाडे अधिक मजबूत होतात.



**खजूर :** खजुरामध्ये नैसर्गिक गोडवा असतो. हा पदार्थ चविष्टसुद्धा आहे. यामध्ये व्हिटॅमिन बी १२ देखील चांगले असते आणि विविध पदार्थांमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. उपवास असताना अनेक वेळा खजूरचे सेवन केले जाते. खजूर खाल्ल्यामुळे मेंद अधिक तल्लख होतो.



**बदाम :** बदामात व्हिटॅमिन बी १२ च्या लक्षणीय आहे. बदाम खाण्याचे अनेक फायदे आरोग्याला होतात. नाश्त्यामध्ये किंवा सॅलड्स, दही किंवा मिष्टान्नामध्ये बदाम टाकून खातात. भारतात बदामाचे उत्पादन पुरेसे नसल्याने त्याची अफगाणिस्तान व इराण येथून आयात होते.



**पिस्ता :** पिस्ता केवळ स्वादिष्टच असतात असे नाही तर त्यामध्ये व्हिटॅमिन बी १२ चे प्रमाण देखील चांगले आहे. ते स्नॅक म्हणून, सॅलड टॉपिंग म्हणून किंवा दही किंवा डेझर्टमध्ये मिसळून खाल्ले जाऊ शकतात. पिस्तामध्ये फाइबर मुबलक प्रमाणात असते.



**काजू :** काजू हे व्हिटॅमिन बी १२ चे मौल्यवान स्रोत आहेत. हे बऱ्याचदा स्नॅक म्हणून खाल्ले जातात. तसेच विविध पदार्थांमध्ये त्याचा वापर केला जातो. काजूचा वापर केल्यामुळे तुमचा आहार स्वादिष्ट आणि पौष्टिकसुद्धा होतो.



**भोपळ्याच्या बिया :** भोपळ्याच्या बियांमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ असते. तसेच इतर आवश्यक पोषक तत्त्वांचा त्यामध्ये समावेश असतो. आपल्या रोजच्या आहारात भोपळ्याच्या बियांचा समावेश करा किंवा स्नॅक म्हणून खा. याशिवाय सूर्यफुलाच्या बिया, अंजीर, अक्रोड यामध्येही बी १२ असते.

## पृथ्वीकडे येतेय अवकाशीय शिळा



पृथ्वीच्या भेटीला अनेक वेळा काही लघुग्रह येत असतात. मंगळ आणि गुरू या दोन ग्रहांच्या दरम्यान अशा अवकाशीय शिळांचा एक पट्टाच आहे. त्याला ‘अ‍ॅस्टेरॉईड बेल्ट’ असेच म्हणतात. मात्र आता एक अशी शिळा पृथ्वीच्या भेटीला येत आहे, जी आपल्या सौरमालिकेतील नाही! ‘मिल्की वे’ नावाच्या आपल्या आकाशगंगेतील कुठल्याशा सौरमालिकेतून आलेली ही लंबगोलाकार शिळा आहे.

२०१७ मध्ये ‘पॅन स्टार्स १’ या हवाई दुर्बिणीनं पहिल्यांदाच ही अनोळखी वस्तू टिपत ‘ओमुआमुआ’ असे तिचे नाव असल्याचे जाहीर केले. ही वस्तू प्रचंड वेगाने आपल्या सौरमालिकेच्या दिशेनं येत असून दुसऱ्या सौरमालिकेतून प्रवास करत पृथ्वी आणि इतर ग्रह असणाऱ्या सौरमालिकेत येणाऱ्या खगोलाचे हे पहिलेच आधुनिक उदाहरण आहे.

हवाईयन भाषेमध्ये ‘ओमुआमुआ’चा अर्थ आहे संदेशवाहक. अवकाशातील प्रवास करणारी ही एक वस्तू बहुधा दुसऱ्या सौरमालिकेतील संदेशवाहक असू शकते या कारणाने तिला हे नाव देण्यात आले आहे.




या अज्ञात वस्तूचा आकार साधारण लंबवर्तुळासम असून १०:१ इतके त्याचे गुणोत्तर असू शकता, असा अंदाज बांधला जात आहे. ही वस्तू एखाद्या लघुग्रह किंवा धूमकेतूहून १० पट मोठी असल्याचेही सांगण्यात येत आहे. सूर्यापासून कैक मैल दूर असणाऱ्या या वस्तूचा वेग ३,१५,००० किमी प्रतितास इतका आहे. खडक आणि धातूपासून ही अज्ञात वस्तू तयार होऊ शकते, असे अभ्यासकांचे मत आहे. जानेवारी २०१८ नंतर ओमुआमुआ नेमके कुठे आहे याची माहिती मिळू शकलेली नाही.

पण, आपल्या आकाशगंगेच्या दिशेनं सुरू असणारा त्याचा प्रवास पाहता अभ्यासकांसाठी ही एक कुतूहलाची आणि तितकीच आव्हानात्मक बाबही ठरत आहे. बरं, ही वस्तू नेमकी पृथ्वीपर्यंत कधी येईल, पृथ्वीच्या नजीक येईल की नाही, आपल्या आकाशगंगेतून तिचा प्रवास कसा असेल याची कोणतीही माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळं तज्ज्ञ मंडळी या ओमुआमुआचा पुन्हा नव्यानं शोध घेण्यासाठी आता कसोशीनं प्रयत्न करताना दिसत आहेत.

## सूर्याचे भावंड असलेला तारा

आपल्या ग्रहमालिकेचा तारा म्हणजे सूर्य. आपल्या या सूर्याचे भावंड असलेला एक महाकाय तारा वैज्ञानिकांनी शोधलेला असून तो ज्या धूळ व वायूच्या मिश्रणातून आपला सूर्य जन्मला तेथेच जन्मला आहे. सूर्याचे भावंड असलेल्या या ताऱ्याचे नाव एचडी १६२८२६ असे असून हा तारा सूर्यापेक्षा १५ पट जास्त वस्तुमानाचा आहे व तो शौरी तारकापुंजात आहे.



ऑस्टिन येथील टेक्सास विद्यापीठाचे इव्हान रामीरेझ यांच्या मते सूर्याची इतर भावंडेही अशाच प्रकारे शोधता येतील व त्यामुळे आपला सूर्य कसा व कुठे तयार झाला तसेच सौरमाला जीवसृष्टीस पोषक कशी बनली या प्रश्नांची उत्तरे देता येतील. रामीरेझ यांनी सांगितले की, आपण कुठे जन्मलो, दीर्घिकेच्या कुठल्या भागात आपण जन्मलो हे समजू घेता येईल. त्या वेळच्या सौरमालेचे सादृश्यीकरण करणे शक्य आहे. या सूर्याची भावंडं असलेल्या ताऱ्यांभोवती पृथ्वीसारखे जीवसृष्टी शक्य असलेले ग्रह असू शकतात.

सुरुवातीच्या अवस्थेत काही ग्रहांची एकमेकांशी टक्कर होऊन त्यांचे तुकडे झाले व त्यामुळे पृथ्वीवर जीवसृष्टी तयार झाली, असे त्यांनी सांगितले. नवीन तारा हा नुसत्या डोळ्यांना दिसत नाही, तो द्विनेत्रीतून दिसतो व व्हेगा ताऱ्यापासून फार दूर नाही. संशोधकांनी मॅक्डनॉल्ड वेधशाळेतील हारलान जे. स्मिथ दुर्बिणीतून अशा २३ ताऱ्यांचा अभ्यास केला. चिलीतील लास कॅम्पनास वेधशाळेतील क्ले मॅगलन दुर्बिणीच्या मदतीने काही ताऱ्यांचा अभ्यास करण्यात आला. ताऱ्यांच्या कक्षा व रासायनिक रचना बघून एचडी १६२८२६ हा तारा शोधण्यात आला.


या ताऱ्याभोवती गुरुसारखे मोठे ग्रह असण्याची शक्यता कमी आहे. लहान ग्रह असण्याची मात्र[illegible] आहे.

## झोपताना एक डोळा उघडा का ठेवते मगर?

मगरीला ‘हँगमन ऑफ वॉटर’ म्हणतात. तिच्या परिसरात मोठमोठे प्राणी सापडल्यानंतर ती त्यांची अशा भयानक पद्धतीने शिकार करते की, तिला पाहून जीवाचा थरथराट होईल. सर्वप्रथम ती भक्ष्याला तिच्या जबड्यात पकडते. यानंतर ती अनेक वेळा आपले शरीर ३६० अंश वळवते. यामुळे शिकार केलेल्या प्राण्याच्या हाडांचा चक्काचूर होतो. त्यानंतर ती आपली शिकार भक्षण करते.

मगर काही वेळा सिंह व बिबट्यासारख्या प्राण्यांचीही शिकार करते. हे प्राणी एका टप्प्यात आल्यानंतर मगर त्यांच्यावर क्षणार्धात झडप घालणार, हे जणू ठरलेलेच असते. डोळ्याचे पाते लवते ना लवते, तोवर मगरीने आपले सावज टिपलेले असते, हे ओघानेच आले. मात्र, हीच मगर अगदी झोपताना देखील आपला एक डोळा उघडा का ठेवते, याचे कारण अर्थातच थक्क करणारे आहे. झडप घातल्यानंतर मगर आपल्या मजबूत जबड्याने सावजाची मान पकडते आणि त्यांना खोल पाण्यात ओढते. अशा धोकादायक मगरीने एक डोळा उघडा ठेवून झोपणे अर्थातच आश्चर्याचे आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे यामुळे एक डोळा उघडा ठेवल्याने मगरीचा मेंदू सक्रिय राहतो. यामुळे, मगर झोपलेली असेल, असे समजून एखादा प्राणी मगरीजवळ जात असेल, तर त्यावेळीही मगरीची झडप ठरलेलीच असते.

मगरीने एक डोळा उघडा ठेवून झोपण्याचे आणखी एक कारण म्हणजे ती झोपेतही आपल्या सावजावर लक्ष ठेवून असते. झोपेतही तिचे सर्व लक्ष आपल्या टप्प्यात एखादा प्राणी येतो का, यावर असते, जेणेकरून झोपेतही भक्ष्यावर वार करून त्याला टिपता येईल. याशिवाय, आपल्याला एखादा धोका नको, यासाठीही मगर सजग असते आणि हे देखील यामागील आणखी एक महत्त्वाचे कारण आहे.






## पृथ्वीलाही होती शनीसारखी कडी?

आपल्या ग्रहमालिकेत शनी हा ग्रह त्याच्या कडीमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरत असतो. पृथ्वीचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे निळेशार पाणी आणि जीवसृष्टी. मात्र एकेकाळी पृथ्वीलाही शनीसारखीच कडी होती! याबाबत एक नवे संशोधन झाले असून त्याची माहिती ‘अर्थ अँड प्लॅनेटरी सायन्स लेटर्स’ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार सुमारे ४६ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीच्या भोवती लघुग्रहांसारख्या अवकाशीय शिळांनी बनलेली रिंग सिस्टिम होती.

पृथ्वीभोवतीची ही कडी लाखो वर्षे अस्तित्वात राहिली होती व तिने पृथ्वीच्या वातावरणावरही प्रभाव टाकला होता. ऑस्ट्रेलियातील मोनाश युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी याबाबतचे संशोधन केले आहे.



मोनाश युनिव्हर्सिटीचे भूवैज्ञानिक अँड्र्यू टॉमकिन्स यांनी सांगितले, मी व माझ्या सहकाऱ्यांनी एके काळी पृथ्वीभोवतीही कडी होती हे पुराव्यानिशी शोधून काढले आहे. आपल्या ग्रहाचा इतिहास समजून घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरू शकते. सुमारे ४६.६ कोटी वर्षांपूर्वी अनेक छोटे लघुग्रह, उल्का पृथ्वीला धडकू लागले होते. यामुळे पृथ्वीवर अनेक विवरेही निर्माण झालेली आहेत. युरोप, रशिया आणि चीनमध्ये आम्हाला चुनखडीच्या दगडांचे एक भांडारच मिळाले, ज्यामध्ये एका प्रकारच्या उल्केचे मोठे अवशेष होते.

या तळातील खडकांमधील उल्कांच्या अवशेषांमधून संकेत मिळतात की या उल्का सध्या पृथ्वीवर कोसळणाऱ्या उल्कांच्या तुलनेत अधिक काळ अवकाशीय रेडिएशनच्या संपर्कात होत्या. त्या काळात अनेक वेळा सुनामीही आली होती. या सर्व गोष्टी एकमेकींशी निगडीत आहेत. अशा उल्कांमुळे निर्माण झालेल्या २१ खड्ड्यांची माहिती उपलब्ध आहे. विशेष म्हणजे हे उल्कांचे खड्डे भूमध्यरेषेच्या जवळील भागात असणाऱ्या ठिकाणी आहेत.

असा एकही खड्डा ध्रुवीय भागांमध्ये आढळलेला नाही. तसे पाहता आपल्या ग्रहमालिकेत शनीलाच कडी आहे असे नाही. गुरू, नेपच्यूनसारखे ग्रह किंवा मंगळाचे फोबोस, डेमोससारखे चंद्र यांनाही विरळ अशी कडी आहे, म्हणजे या ग्रहांभोवतीही असे काही अवकाशीय खडक, माती फिरत आहेत. पृथ्वीलाही एके काळी अशी कडी असेल, असे म्हणण्यास भरपूर वाव आहे.

## माशांमधील विशेष क्षमता

मासे आवडीनं खाणाऱ्यांची संख्या खूपच मोठी आहे. कोणाला समुद्रातील मासे आवडतात, तर कोणाला नदी, धरण म्हणजेच गोड्या पाण्यातील मासे आवडतात. अनेक जण मत्स्यशेती करून उदरनिर्वाहदेखील करतात. नुकत्याच एका संशोधनातून असे दिसून आले की, माशांनाही भावना असतात. माशांमध्ये भावना असतात का, त्यांना वेदना होतात का, त्यांच्यात स्वतःला ओळखण्याची क्षमता आहे का, असे प्रश्न अनेकांना पडतात. याच पार्श्वभूमीवर सिडनी येथील मॅक्केरी विद्यापीठाचे प्रोफेसर कुलूम ब्राऊन यांनी केलेल्या संशोधनातून सिद्ध झाले आहे की, माशांमध्ये स्वतःला ओळखण्याची क्षमता असते. ते आरशात स्वतःला ओळखतात. त्यामुळे गाय, मांजर, कुत्रा किंवा एखाद्या पक्ष्याशी ज्या पद्धतीने आपण वागतो, अगदी तसेच माशांशी देखील वागू शकतो, असे ब्राऊन यांनी म्हटले आहे.

ओसाका विद्यापीठाच्या अभ्यासातदेखील मासे स्वतःला ओळखू शकत असल्याचे स्पष्ट झाले. विद्यापीठामध्ये माशांना भूल देऊन बेशुद्ध करण्यात आले. त्यानंतर जेव्हा ते शुद्धीवर आले, तेव्हा त्यांनी आरशात स्वतःला पाहिले व स्वतःच्या मानेखालील चिन्ह ओळखण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी माशांनी स्वतःला दगडावर घासले. १९७० मध्ये सुरू करण्यात आलेल्या मिरर सेल्फ रिकग्निशन टेस्टनुसार हे संशोधन करण्यात आले आहे.वाईकातो विद्यापीठातले फिश इकोलॉजिस्ट प्रोफेसर निक लिंग यांनी याबाबत सांगितले की, माशांना वेदनांची जाणीव होऊ शकते. रेनबो ट्राउटसारख्या माशांना मधमाशीचं विष इंजेक्शनद्वारे दिल्यास त्यांच्या श्वासोच्छ्वासाचा वेग वाढतो. ते स्वतःला खडकावर घासायला लागतात. शार्कमध्ये नोसिसेप्टर्स नसतात, त्यामुळे त्यांना वेदना होत नाहीत; पण, याचा अर्थ असा होत नाही की, त्यांना वेदना होईल, असे काम करावे. माशांच्या प्रजाती खूप वैविध्यपूर्ण आहेत. न्यूझीलंडमधील कँटरबरी विद्यापीठातले मानसशास्त्रज्ञ डॉ. मायकल फिलिप यांनी सांगितले की, माशांबद्दल एखाद्या व्यक्तीचे वर्तन त्याच्या स्वतःच्या आकलनानुसार असते. जेव्हा एखाद्या प्राण्याकडे अन्न म्हणून पाहिले जाते, तेव्हा अनेकजण



## कहाणी विमानाशिवाय विश्वभ्रमंतीची

आपल्या आजूबाजूला अशा अनेक व्यक्ती असतात, ज्यांना भटकंतीची फार आवड असते. ते सतत नवनवीन ठिकाणी जाण्याच्या योजना आखत असतात. काही जणांना जगभर फिरण्याची आणि नवीन गोष्टी शोधण्याची आवड असते. या आवडीतून ट्रॅव्हर्स टोमासो फॅरिनाम आणि एड्रियन लाफुएन्ट नावाच्या दोन मित्रांनी प्रवास सुरू केला. त्यांचा प्रवास इतरांसारखा नाही. त्यांनी संपूर्ण प्रवासात एकदाही विमानातून प्रवास केलेला नाही. पर्यावरणाची मदत आणि पैशांची बचत ही दोन उद्दिष्टे यातून पूर्ण झाल्याचे त्यांचे मत आहे.

फॅरिनाम आणि लाफुएन्ट या दोघांनी वर्षभरापूर्वी प्रवास सुरू केला होता. त्यांना हा प्रवास अविस्मरणीय बनवायचा होता. नवीन गोष्टी शोधण्याच्या उद्देशाने ते घरातून बाहेर पडले होते. या दोघांनी गेल्या १५ महिन्यांत एकदाही विमानात न बसता २७ देशांना भेटी दिल्या आहेत. २५ वर्षांचा फॅरिनाम आणि २७ वर्षांचा लाफुएन्ट हे दोघं स्वतःला सस्टेनेबल एक्सप्लोरर म्हणतात. अशाच प्रकारे संपूर्ण जगाची सफर करण्याची त्यांची इच्छा आहे.



फॅरिनाम मूळचा इटलीचा आहे. जलमार्गाने जगभर फिरायचे, असा निर्णय घेतलेला फॅरिनाम म्हणतो, आम्ही होडीचे सहप्रवासी आहोत. फेसबुकवर एका जहाजाच्या कॅप्टनशी बोलणे झाले. त्याने आम्हाला आपल्यासोबत येऊ दिले. हे दोघे म्हणतात की, विमान प्रवास टाळून त्यांनी पर्यावरणाला मदत तर केलीच, शिवाय पैशांची बचतही केली. २७ देशांना भेट देताना फॅरिनाम आणि लाफुएन्ट यांनी केवळ ७७०० डॉलर्स (सुमारे ६ लाख ४६ हजार ३४६.७४ रुपये) खर्च केले आहेत.

दोघांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, जेव्हा त्यांनी मित्रांना आणि कुटुंबीयांना त्यांच्या प्रवासाची योजना सांगितली होती तेव्हा ते घाबरले होते. कारण, या दोघांनी कोणत्याही अनुभवाशिवाय पॅसिफिक महासागर पार करण्याचा निर्णय घेतला होता. माणूस इतर वनस्पती, प्राणी आणि इतर माणसांसोबत एकत्र राहू शकतो की नाही, याचा शोध घेण्याच्या उद्देशाने ते प्रवास करत आहेत.

फॅरिनामने सांगितले, की पनामाच्या खाडीतले पहिले १० दिवस धोकादायक होते. त्यातून प्रवास करताना त्यांना वारे, वादळ आणि मोठ्या लाटांचा सामना करावा लागला. अशा स्थितीमध्ये नौका बुडण्याचा धोका असतो. दोघांचा हा प्रवास गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यात सुरू झाला. दक्षिण अमेरिकेत जाण्यासाठी त्यांनी ३९ दिवस अटलांटिक महासागरातून प्रवास केला.

# जुमलेबाजी करणाऱ्या राजकीय पक्ष, नेत्यांच्या विरोधात लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याची तरतूद ?

## लोकशाही संरक्षण कायद्यातंर्गत याचिकेचा वकील संघटनांचा प्रस्ताव



नगर – जुमलेबाजी व अक्कलमारी करुन नागरिकांना भूलथापा देणाऱ्या राजकीय पक्ष आणि नेत्यांच्या विरोधात लोकशाही संरक्षण कायद्यातंर्गत लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याची तरतूद वकील संघटनेने सुचविली आहे. लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी वकिलांनी सुरू केलेल्या प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्याचा भाग म्हणून या कायद्यात लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याची तरतूद व्हावी आणि अशा याचिका देशातील उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयामध्ये निवाड्यासाठी ठेवण्याची तरतूद या कायद्यात व्हावी, असा पीपल्स हेल्पलाईन व वकील संघटनांचा प्रयत्न आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका मोठ्या सभेमध्ये जाहीर भाषणात सांगितले होते की, राष्ट्रवादी पक्षाचे नेते अजित पवार यांनी कोट्यावधीचा सिंचन घोटाळा केला आहे. त्यांना पुढील काही महिन्यात जेलमध्ये जावे लागेल. त्यानंतर महाराष्ट्रात भाजपचे आणि राष्ट्रवादीचे सरकार पहाटे झालेल्या शपथविधी मध्ये सत्तेवर आले. त्यामध्ये अजित पवार यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले. यातून पंतप्रधान आणि त्यांच्या पक्षाने भारतातील लोकशाहीची केलेली विटंबना जनता विसरणार नाही. यातून भारतातील आम लोकशाहीमध्ये मतदार अक्कलमारी करण्याचा अधिकार राज्यकर्त्यांना असल्याचा भ्रम झाला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अमेरिकेचे मावळते राष्ट्रपतीनी स्वतःच्या मुलाविरुद्ध असलेल्या खटल्यामध्ये मुलाला सर्वत्र माफी घोषित केली. त्यामुळे जगभरामध्ये लोकशाहीवर विश्वास असलेल्या लोकांमध्ये निराशा निर्माण झाली आहे. सत्तेवर असलेली लोक आपल्या सत्तेचा वापर आपल्या नातेवाईकांसाठी आणि जवळच्या लोकांसाठी कशाप्रकारे सर्रास करतात, या बाबी लोकशाहीला घातक आहेत. यामुळे भारतामध्ये लोकशाही संरक्षण कायदा आणताना लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याचा अधिकार देखील तमाम जनतेला मिळाला पाहिजे, असा वकील संघटनांचा आग्रह आहे.

सत्तेवर असणाऱ्या पक्षांनी किंवा मुख्यमंत्री, पंतप्रधान किंवा मंत्रिमंडळातील सदस्यांनीच आपल्या सत्तेचा वापर स्वार्थासाठी किंवा कुटुंबासाठी किंवा जवळच्या व्यक्तीसाठी केला. हे प्रथम दर्शनी लोकांसमोर आले, तर त्यातून लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याचा अधिकार जनतेला मिळणार आहे. अशा याचिकांच्या निर्णयातून दोषी असलेल्या राजकीय पक्षाची मान्यता निवडणूक आयोगाला काढून घेण्याचा आदेश देखील सर्वोच्च न्यायालयाने किंवा उच्च न्यायालय देऊ शकतील अशी तरतूद या कायद्यामध्ये करण्यासाठी वकील संघटना प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राजकीय सत्तेच्या दुरुपयोग करणाऱ्या व्यक्तीला सहा वर्षापर्यंत निवडणुकांपासून वंचित ठेवण्याची तरतूद अशा कायद्यात व्हावी. त्याचबरोबर अशा सत्तेवरच्या व्यक्तीला दंड आणि सजादेखील सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय करू शकेल. भारतात आणि जगभरात आजच्या घडीला कोर्ट अवमान याचिका चालविता येतात, परंतु त्यांना मर्यादा आहे. लोकशाही अवमान याचिकांमधून राजकीय पक्षांवर आणि राजकीय सत्तेवर असणाऱ्या लोकांवर मोठा अंकुश जनतेला ठेवता येणार आहे. राजकीय पुढारी आणि त्यांचे पक्ष जनतेला आकाशातील तारे आणून देण्याचे आश्वासन देतात आणि त्यातून मतदार अक्कलमारी करतात. मागच्या दाराने सत्ता मिळवतात, राजकीय सत्ता मिळण्यासाठी हजारो लबाड्या करणाऱ्यांना यापुढे तुरुंगाची हवा खावी लागणार आहे. अशी तरतुद कायद्यात व्हावी, यासाठी वकिलांचा प्रतिसाद व्यापक होत असल्याचे अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्ष सुरू आहे. अशा वेळेस लोकशाही संरक्षण कायदा आणि लोकशाहीचे सर्रास होणारे वस्त्रहरण पूर्णपणे थांबण्यासाठी लोकशाही संरक्षण कायदा आणि त्यामध्ये लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याचे अधिकार याला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले असल्याचेही अ‍ॅड. गवळी यांनी स्पष्ट केले.

# गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी घेवून चाललेला टेम्पो पकडला

## पोलिसांनी आठ जनावरांची सुटका करत तिघाविरुद्ध केला गुन्हा दाखल



गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी घेवून चाललेला टेम्पो कोतवाली पोलिसांनी पकडून जप्त करत जनावरांची सुटका केली आहे.

नगर – राज्यात गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास तसेच बेकायदेशीर वाहतूक करण्यास बंदी असतानाही गोवंशीय जनावरांची चारापाण्याची कुठलीही सोय न करता निर्दयीपणे कत्तल करण्याचे उद्देशाने वाहतुक करणारा टेम्पो कोतवाली पोलिसांनी पकडून आठ गोवंश जनावरांची सुटका केली. सदर कारवाई शहरातील पुणे बसस्थानकाचे पाठीमागील बाजुस स्वस्तिक चौक ते बुरुडगाव रोड दरम्यान गुरुवारी (दि.५) सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली आहे.

कोतवाली पोलिसांचे पथक शहरात गस्त घालत असताना त्यांना नगर पुणे रोडवरील स्वस्तिक चौक येथून बुरूडगाव रोड कडे एक पांढऱ्या रंगाचा टेम्पो जाताना दिसला.पोलिसांनी टेम्पो एल आय सी ऑफिस जवळ थांबवला. टेम्पोची पाहणी केली असता आतमध्ये आठ गोवंशीय जनावरे त्यांची चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने बांधलेली आढळून आली. पोलिसांनी टेम्पोतील तिघांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे योगेश अरुण अजबे (चालक, वय ४०), तुषार संजय पवार (वय २७), अभिषेक सतिष पवार (वय २४, सर्व रा.मु.सारोळा पो. राजुरी ता. जामखेड) अशी असल्याचे सांगितले. पोलीसांनी त्यांना ही जनावरे कोठे घेऊन जात आहे, अशी चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

त्यामुळे पोलिसांनी ५ लाख रुपये किमतीचा टाटा एनपीटी ९०९ कंपनीचा टेम्पो ( क्र.एम एच ४३ यु ९१५२ ) ४० हजार रुपये किमतीच्या एकुण ८ गायी असा एकूण ५ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. तिघांना ताब्यात घेत त्यांच्या विरुद्ध पो.कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २९९,३ (५) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ), ५ (ब). तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ व मोटार वाहन कायदा कलम ८५/१७७ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली असुन अधिक तपास पोलिस हवालदार एस. एस. डाके हे करीत आहेत.





पावसामुळे पटवर्धन चौकातील रस्त्यावर पाणी साचले असून, रस्त्याची मोठी दुरवस्था झाली आहे.

# पावसामुळे पटवर्धन चौकातील रस्त्याची दुरवस्था : मंजुरी असूनही काम प्रलंबित

नगर – रात्री झालेल्या पावसामुळे शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या पटवर्धन चौकातील रस्त्यावरील मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांचे हाल झाले. रस्त्याच्या कडेच्या नाल्या तुंबल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली.

गेल्या दोन दिवसापासून नगर शहरात ढगाळ वातावरण होते त्यातच शुक्रवारी पहाटेच्या सुमारास पावसाने अचानक हजेरी लावली. त्यामुळे पावसाचे पाणी ठिकठिकाणी साचले.

शहरातील पटवर्धन चौकातील रस्त्याची मोठी दुरावस्था असल्याने त्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत या खड्ड्यात पावसाचे पाणी साचले तर पावसामुळे नाल्या तुंबल्यामुळे नाल्याचे पाणीही रस्त्यावर पसरले त्यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरली होती.

या परिसरात हॉस्पिटल, शाळा, निवासस्थाने, दुकाने असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. यामुळे संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. या रस्त्याचे कामकाज आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून मंजूर झालेले असून अद्याप या रस्त्याचे काम झाले नाही. याबाबत येथील नागरिक मुकुंद वाकळे यांनी नवा मराठाशी बोलताना म्हटले आहे की, या रस्त्याच्या कामाकरिता याचे पाईप येऊन पडलेले असून अद्याप काम न झाल्याने नागरिकांना रस्त्याने जाताना मोठी कसरत करावी लागते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श विचार आजही मार्गदर्शक आणि प्रेरणादायी : अभिषेक कळमकर

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वात श्रेष्ठ संविधान निर्माण करून भेदभाव विरहित समाज रचना अस्तित्वात आणण्यासाठी मोठे योगदान दिले. स्वातंत्र्योत्तर काळात ७५ वर्षांपेक्षा अधिक कालावधीत राज्य घटनेमुळेच भारताने मोठी प्रगती साधली आहे. डॉ. आंबेडकर यांचे आदर्श विचार आजही मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहेत. एकसंघ भारत आणि एकसंघ समाज व्यवस्था ही डॉ. आंबेडकर यांच्या अद्वितीय योगदानाची मोठी देणगी आहे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी केले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कळमकर यांनी मार्केट यार्ड चौकात डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी माजी नगरसेवक संजय झिंजे, रोहन शेलार, चंद्रकांत उजागरे, भीमराज कराळे, राहुल घोरपडे, अविनाश ठोंबरे, अभिषेक जगताप, संतोष जाधव, ऋषिकेश शेटे, चैतन्य ससे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्केट यार्ड चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना अभिषेक कळमकर आदी.

# वर्षभरापासून आकडा टाकून घरात सुरु असलेली वीजचोरी पकडली

## घरमालकाविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल, महावितरणच्या पथकाची कारवाई

नगर – गेल्या वर्षभरापासून तारेवर आकडा टाकून घरात सुरु असलेली वीजचोरी महावितरणच्या पथकाने पकडली आहे. सुमारे ३० हजार ७४५ रुपये किमतीची १५०४ युनिट वीज चोरी करणाऱ्या घरमालकाविरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामदास मंजाबापू जाधव (रा. निमगाव वाघा, ता.नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत महावितरणच्या जखणगाव शाखा कार्यालयातील कनिष्ठ अभियंता संदीप विठ्ठल बराट (वय ४२, रा. देहरे ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. अभियंता बराट यांच्यासह कर्मचारी हेमंत सोनवणे, सागर उदार हे दोन पंचांना घेवून २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास निमगाव वाघा गावात वीजचोरी शोधण्यासाठी गेले असता मयत मंजाबापू सावळेराम जाधव यांच्या नावावर वीजजोड असलेल्या घरात सध्या राहात असलेला त्यांचा मुलगा रामदास मंजाबापू जाधव यांना ओळखपत्र दाखवत घरातील वीजजोडणी तपासली असता त्यांनी त्यांच्या घराच्या बाजूला असलेल्या एल टी पोलच्या फेज व न्युट्रलला आकडा टाकून अंदाजे ६० फुट लांबीची काळ्या रंगाची केबल वापरून घरामध्ये अनाधिकृत वीज पुरवठा घेतल्याचे आढळून आले.

सदर काळ्या रंगाच्या अंदाजे ६० फुट लांबीच्या सर्विस केबलवर रामदास जाधव यांनी मागील १२ महिन्यापासून महावितरण कंपनीची १५०४ युनिटची वीजचोरी केली असून त्याची किंमत २६ हजार ७४५ व कलम १५२ प्रमाणे तडजोड रक्कम ४ हजार अशी एकूण ३० हजार ७४५ इतक्या रकमेची वीज चोरी केलेली आहे. रामदास जाधव यांना वीज चोरीचे देयक देण्यात आले व ते भरण्यासाठी ७ दिवसांची मुदत देण्यात आली. मात्र त्यांनी मुदतीत वीज बिल भरणा न केल्याने त्यांच्या विरुद्ध भारतीय वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार फिर्याद देत असल्याचे अभियंता बराट यांनी म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी घरमालक रामदास जाधव यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनी अहमदनगर महाविद्यालयात कार्यक्रम



अहमदनगर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

नगर – अहमदनगर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवतावादी दृष्टीकोन भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरत असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डी. आर. जे. बार्नवस यांनी केले. या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य डॉ. रज्जाक सय्यद, उपप्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य डॉ. प्रीतम बेदरकर यांच्या सह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी अद्वेता सुद्रिक, साक्षी भोसले, श्रेया घोरपडे व रिया तिवारी या विद्यार्थिनींनी आपले मनोगत मांडले.

निमिषा बंडेलू यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर, सचिन मोरे, पोपट सिनारे, प्रा. लक्ष्मीप्रभा उपाडे व प्रा. आनंद रायकवाड यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न घेतले.


SHRIRAM HOUSING FINANCE

**श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

**मुख्य कार्यालय:** लेव्हल–३, वोक्खार्ड टॉवर्स, इस्ट विंग, सी–२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई–४०००५१. दुर.:०२२–४२४१०४००, ०२२–४०६०३१००. **वेबसाईट:** http://www.shriramhousing.in.
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र. ५, जुना क्र. ११, दुसरी लाईन, सेनाटोफ रोड, अलवार पेठ, तेनाम पेठ, चेन्नई ६०००१८ **शाखा कार्यालय:** श्रीराम हौसिंग फायनान्स लिमिटेड, झोपडी कॅन्टीन जवळ, शिर्डी रोड, अहमदनगर ४१४००३

**परिशिष्ट–४–ए (नियम ८(६) ची तरतूद पहा) स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल अ‍ॅसेटस् अ‍ॅन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीअन्वये स्थावर मालमत्तेचे विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार आणि जामिनदारांना येथे सूचना देण्यात येत आहे की, **श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**कडे तारण/अधिभारीत असलेल्या खाली नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेचा वास्तविक ताबा **श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**च्या (एसएचएफएल) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमुद केलेले कर्जदार व जामिनदारांकडून **श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांना देय असलेली खाली तक्त्यात नमुद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार ई–लिलाव आधारावर **जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि जसे जेथे आहे या तत्त्वावर दिनांक २६.१२.२०२४ रोजी स.११.३० ते दु.१२.३० दरम्यान** ई–लिलावाने विक्री केली जाईल. कर्जदार, जामिनदार, तारणकर्ता, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन व ज्ञात अधिभार, ताबा प्रकार, आरक्षित मुल्य व इसारा रक्कम आणि वाढिव मुल्याचे तपशील खालीलप्रमाणे:

| कर्जदार/सह–कर्जदार/ जामिनदार/तारणकर्ताचे नाव | १३(२) मागणी सूचना तारीख व रक्कम | आरक्षित मूल्य (रु.) व बोली वाढविणे | इसार रक्कम ठेव (इरठे तपशील) | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती व निरीक्षण तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. दीप मनिष मिसाळ<br>२) सौ. आरती दीप मिसाळ<br>३) सौ. बबिता मनिष मिसाळ<br>४) श्री. जय मनिष मिसाळ<br>५) श्री. मनिष दत्तात्रय मिसाळ<br>सर्वांचा राहण्याचा पत्ता :<br>फ्लॅट क्र. २०३,<br>अ‍ॅव्हेन्यू पार्कजवळ,<br>शिलाविहार रोड,<br>महेंद्रा शोरुमजवळ,<br>सावेडीरोड,<br>अहमदनगर ४१४००३<br>ताबा दिनांक व ताबा प्रकार<br>२६/०७/२०२२<br>प्रत्यक्ष ताबा<br>माहित नाही | मागणी सूचना तारीख १९/०५/२०२२ रुपये ३८,०९,४९७/– (रुपये अडोतीस लाख नऊ हजार चारशे सत्यांन्नव फक्त) नुसार १९/०५/२०२२ कर्ज संदर्भ क्रमांक एस.एच. एल.एच.ए.एम.डी. आर. ००००१७२ तसेच त्यावरील पुढील व्याज व इतर अधिभार तसेच खर्च ६० दिवसांच्या आत सूचना मिळाल्या तारखेपासून भरावा. | रुपये २२,००,००० (बावीस लाख रुपये फक्त)<br>बोली वाढविणे रुपये १०,०००/– (दहा हजार रुपये)<br>इसारा रक्कम (इरठे) (रुपये)<br>रुपये २,२०,०००/– (रुपये दोन लाख वीस हजार फक्त)<br>इरठे सादर करण्याची अंतिम तारीख ईएमडी २४ डिसेंबर २०२४ वेळ : सकाळी १०.०० ते दुपारी ०४.०० | इएमडी रक्कम ठेवीची रक्कम आर टी जी एस एन ई एफ टी इरठे रक्कम खाली नमूद केलेल्या खाते तपशिला नुसार जमा करावी.<br>बँकेचे नाव : अ‍ॅक्सिस बँक लिमिटेड<br>शाखा : बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई<br>बँक खाते क्र. चालू खाते क्र. ९११०२००४५६७७६३३<br>आय.एफ.एस.सी. कोड यु.टी.आय.बी. ०००२३० | २६ डिसेंबर २०२४<br>वेळ– दुपारी ११.३० ते दुपारी १२.३० | अशफाक पत्का ९८१९४१५४७७<br>सुनील मानेकर ८९९९३४४८९७<br>मयूर भोजने ८८९८५२७०७६<br>निरीक्षण तारीख २१ डिसेंबर २०२४<br>वेळ : दुपारी १२.०० ते दुपारी ०३.०० |

**१) मालमत्तेचे वर्णन :** अविभाज्य भाग, अहस्तांतरित भाग फ्लॅट क्र. २१७, बांधकाम ३५.५० स्क्वेअर मीटर, त्यावरील बांधकाम ३८.२१० स्क्वेअर मीटर, एकूण बांधकाम क्षेत्र ४५.०३५ स्क्वेअर मीटर, बाल्कनी बांधकाम क्षेत्र ३.४८ स्क्वेअर मीटर, एकूण बांधकाम क्षेत्र ४८.८७५ स्क्वेअर मीटर दुसरा मजला 'युवराज रेसिडेन्सी' नावाची इमारत बांधकाम क्षेत्र प्लॉट क्रमांक १/१ एकूण क्षेत्र १७८२.०४ स्क्वेअर मीटर, सर्व्हे क्रमांक ६६/३/१ माळीवाडा गावाचा भाग अहमदनगर. त्याच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस – मोकळी जागा, पश्चिमेस – रिकामी जागा, उत्तरेस – फ्लॅट क्रमांक २१८, दक्षिणेस – फ्लॅट क्रमांक २१६.

२) अविभाज्य भाग अहस्तांतरित भाग फ्लॅट क्रमांक २१८ (कार्पेट भाग– ३५.५० स्क्वेअर मीटर), बांधकाम क्षेत्र ३८.२१० स्क्वेअर मीटर, कॉमन क्षेत्र भाग ६.८२५ स्क्वेअर मीटर, एकूण बांधकाम क्षेत्र ४५.०३५ स्क्वेअर मीटर, बाल्कनी बांधकाम क्षेत्र ३.८४ स्क्वेअर मीटर, एकूण बांधकाम क्षेत्र ४८.८७५ स्क्वेअर मीटर. दुसऱ्या मजल्यावर 'युवराज रेसिडेन्सी' नावाची इमारत, एकूण बांधकाम प्लॉट क्रमांक १/१ वर एकूण क्षेत्र १७८२.०४ स्क्वेअर मीटर, जे सर्व्हे क्रमांक ६६/३/१ गाव– माळीवाडा, अहमदनगर येथे आहे. त्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे : पूर्वेस– रिकामी जागा, पश्चिमेस– मोकळी जागा, उत्तरेस– मोकळी जागा, दक्षिणेस– फ्लॅट क्रमांक २१७.

कोणतेही कारण न दर्शविता काही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याकडे राखून आहे. विक्रीच्या सविस्तर नियम व अटीकरिता आणि निविदा सादर करण्याचे ठिकाण, निविदा उघडणे व लिलावाचे ठिकाण याकरिता कृपया आमच्या वेबसाईटला तसेच श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या http://shriramhousing.in/e-auction-Residential वर श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वेबसाईटवर दिलेल्या वेबसाईटला भेट द्या.
जे संकेतस्थळाच्या https:// shriramhousing.in/e-auction-Residential या पत्त्यावर श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन लिलाव आमची लिलाव एजन्सी सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता: प्लॉट क्र. ६८, ३ रा मजला, सेक्टर ४४, गुरुग्राम १२२००३, हरयाणा यांच्या https://www. bankeauctions.com या वेबसाईटवर पार पाडला जाईल. कोणत्याही सहाय्यासाठी, तुम्ही tnc1india.com, supportbankeauctions.com या इमेल आयडीवर इमेल पाठवू शकता.

ऑनलाईन लिलाव httpps:/eauctions.samil.in आमच्या लिलाव एजन्सी श्रीराम ऑटोमोबाईल्स इंडिया लिमिटेड (एमएएमआयएल) पत्ता– २ रा मजला, बेस्ट स्काट टॉवर, नेताजी सुभाष पॅलेस, पितमपुरा, दिल्ली–११००३४, संपर्क नाव– श्री देबज्योती आणि मोबाईल नं. ९१–९८७४७०२०२१ आणि ई–मेल आय.डी. debiyoti.r@123done.in नोटीस – कर्जदार / सहकर्जदार / जामिनदार, तारणदारांनी नोटीस स्पीडपोस्ट / रजिस्टर पोस्ट, कोरियरने लिलावापूर्वी भरावी.

सरफायसी कायदा २००२ च्या नियम ८(६) अन्वये वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना:
कर्जदार/तारणकर्ता/जामिनदार यांना येथे सुचित करण्यात येत आहे की, ई–लिलावाच्या तारखेपुर्वी अर्थात २६.१२.२०२४ पुर्वी व्याजासह वर नमुद केलेली संपुर्ण रक्कम जमा करावी, अन्यथा मालमत्तेचा लिलाव/विक्री केली जाईल आणि उर्वरित रक्कम असल्यास ती व्याज व शुल्कासह वसुल केली जाईल.

दिनांक : ०६.१२.२०२४
ठिकाण : अहमदनगर

सही/– प्राधिकृत अधिकारी
श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

